**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 579/200.**

डॉ. बलवंत नत्थुजी मेश्राम

477 हिवरी ले आउट नागपूर 440008 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

कुलसचिव

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

सेमीनरी हिल्स नागपूर

2) डॉ. एस. एन. पाटील

जन माहिती अधिकारी तथा

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांचेकडे सहयोगी प्राध्यापक (शरीररचना शास्त्र) या पदासाठी

सादर केलेला अर्ज नाकारण्यात आल्याची कारणे.

माहिती टपालाने किंवा व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 4.6.2008 रोजी अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मत अथवा अभिप्राय मागता येत नाही. असे मत अथवा अभिप्राय नाकारण्याचे कायद्यानुसार माहिती अधिकारी यांना अधिकार प्राप्त आहे. या तरतुदीच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती मताभिलाषाची आशा बाळगणारी असल्यामुळे देता येत नाही. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.7.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना स्क्रुटीनी स्लिप देण्यात आलेली आहे. व त्या स्क्रुटीनी स्लिपवर अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध झालेली आहे. व यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.980–981

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 582/2008.**

श्री नामदेव तुकाराम भुयारकर
प्लॉट क्र. 14 अ, गाडगेबाबा नगर, रमना मारोती रोड,
ज्याती प्रा. शाळेच्या मागे नागपूर –9 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
2) श्री एस. एच. मुज्जनवार
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांची नोटिस कार्यालयात परत आलेली आहे. नोटिसीवरील पत्ता व नोटिसीच्या पाकीटावर दिलेला पत्ता तसेच अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलात दिलेला पत्ता हा एकच आहे. तरीसुध्दा नॉट नोन अशाप्रकारे शेरा मारुन नोटिस परत आलेली दिसून येते. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे 1900 आणि 572 या लेआउट मध्ये कमला जमीन धारणा कायदा 1976 या कायदयान्वये एन.आय टी ला हस्तांतरीत झालेल्या अनधिकृत लेआउटसची यादीची प्रमाणीत प्रत मिळण्याबाबत.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.7.2008 रोजी मागितलेली माहिती एकत्रित नसल्यामुळे संकलीत करुन उपलब्ध करुन देण्यात येईल असे उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.7.2008 रोजी प्रथम प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 29.7.2008 व 13.8.2008 रोजी ठेवण्यात आली होती परंतु अपीलकर्ता हे सुनावणीस उपस्थित झाले नसल्यामुळे दि. 21.8.2008 ला यादी उपलब्ध असल्यास त्याची झेरॉक्स प्रत नियमानुसार फी आकारुन कार्यकारी अभियंता (नियमितीकरण) तथा माहिती अधिकारी यांनी आदेश मिळाल्यापासून एक महिन्याचे आत उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु एक महिन्याचा कालावधी पुर्ण होण्याआधीच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जुनी व एकत्रित नसल्यामुळे संकलीत करण्याचे काम सुरु आहे. माहिती संकलीत झाल्यानंतर पुरविण्यात येईल. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय हा दि. 21.9.2008 रोजी देण्यात आलेला आहे. व आजपर्यंत सुध्दा माहिती संकलीत झालेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ होत आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन करण्यात आलेले नाही तरी अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध असलेली माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी. व तशी पोच द्यावी. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन न दिल्यास त्यांना अधिनियमाच्या कलम 18 (1) प्रमाणे तक्रार करता येईल व तक्रारीनंतर विद्यमान माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.982–984

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 584/2009.**

श्री गुरुदेव व्यंकटेश ताजणे
रा. जाटलापुर पो. मासोद
ता. काटोल जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नागपूर
2) श्री पी. बी. देवगडे
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
लघु सिंचाई विभाग
जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात 1977–78 या कालावधीतील जमिनीचा योग्य मोबदला मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.3.2008 रोजी अपीलकर्ता यांना रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दि. 23.1.2008 रोजी दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या जमिनीचा मोबदला जरी मागितला असला तरी त्या संबंधातील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतु तसे न करता अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील जरी दाखल केले होते तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी चौकशी करुन अपीलकर्ता यांना कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु अपीलकर्ता हजर नाही या कारणास्तव अपील हे नस्तीबध्द केले आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना अधिनियमाच्या तरतुदींची काहीही माहिती दिसून येत नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली त्याकरीता ते दोषी आढळुन येतात. व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी न घेता अपील नस्तीबध्द केले त्यामुळे त्यांना अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.985–987

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 580/2008.**

डॉ. उदय सज्जन थुल
गुलमोहर अपार्टमेंट, संगीत नगर,
तुकुम, चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहा. धर्मदाय आयुक्त
चंद्रपूर
2) श्री अरुण गोकुलजी घोटेकर
जन माहिती अधिकारी तथा
अध्यक्ष
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल सोसायटी
पुगलिया नगर सिव्हील लाईन चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल सोसायटी यांचेकडे त्यांच्या कंपलसरी रिटायरमेंट आदेशाबाबत माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 19.7.2008 रोजी व त्यात माहितीकरीता अतिरिक्त खर्चाची मागणी केलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी माहितीकरीता खर्चाचा भरणा केला नाही. मात्र दि. 21.7.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अर्जदाराने त्यानंतर पत्रे दाखल केलेली दिसून येतात. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.8.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दि. 11.8.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती चुकीची दिलेली आहे. त्यांना विद्यापीठ कायदा लागू असून शिक्षा महाराष्ट्र सिव्हल सर्व्हिसेस रुल 1980 प्रमाणे बजावण्यात आला आहे असे कळविले. हे चुकीचे आहे. परंतु माहितीचा अधिकार या अधिनियमाप्रमाणे माहिती ही जशी सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात उपलब्ध असते त्या साहित्यातच ती उपलब्ध असते. उपलब्ध माहिती मध्ये निर्णय चुकीचे घेतले असल्यास त्याबाबत स्वतंत्रपणे तक्रार ही न्यायालय किंवा योग्य त्या सक्षम अधिका–याकडे करावी लागते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली ती जसा निर्णय घेतलेला आहे तशी असल्यामुळे माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.988–990

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 465/2008.**

श्री अश्विनकुमार उत्तमचंद लाड
कार्यालय उद्योग सह संचालक
नागपूर विभाग नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. के. रा>त
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती गोंदिया
2) श्री डी. एस. चौधरी
जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी
पंचायत समिती गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.4.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.2.2008 रोजी राज्य माहिती आयोग म्हणून खंड विकास अधिकारी यांचे कार्यालयात वैद्यकीय प्रतिपूर्ती बिल याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 12.2.2008 रोजी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) अन्वये या अधिनियमा अंतर्गत येत नसलयामेळे आपण दि. 5.2.2008 ला सादर केलेले जोडपत्र अ मधील अर्ज दप्तर दाखल करण्यात येते असे माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 29.2.2008 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी उद्योग सह संचालक यांचेकार्यालयात प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना तीन वेळ उपस्थित राहण्यास पत्र दिलेले असून उपस्थित झाले नाही म्हणून सदरचे अपील हे दप्तरी दाखल करण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, डी.एच.ओ. आरोग्य विभागानी रु. 12101/— मागणी केली होती त्यापैकी रु. 5010/— मिळाले डी.एच.ओ. आरोग्य विभागानी मंजुर केले होते. एम आर आय नामंजूर झाल्याचे कारण देण्यात आले नाही असे त्यांनी आयोगाकडे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहितीच्या अधिका—यामध्ये कोणत्याही प्रकारची कारवाई करुन मागता येत नसल्यामुळे व अपीलकर्ता यांनी कागदपत्रे मागितली नसल्यामुळे त्यांना तसे उत्तर देण्यात आले होते. असे असले तरी अपीलकर्ता यांना त्यांच्या वैद्यकीय देयकाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भामध्ये जी टिपणी झालेली असेल त्या टिपणीची छायांकीत प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 5.2.2008 च्या अर्जातील मागितलेल्या वैद्यकीय देयकाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भामध्ये वैद्यकीय देयक मंजुर करतांना जी टिपणी झालेली असेल त्या टिपण्यीच्या छायांकीत प्रती जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयातून उपलब्ध करुन घेवून हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत पुरविण्यात यावे तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.4.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.991–993

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 519 / 2008.**

श्री हनुमंतराव मोनाजी रा>त
टिळक नगर वार्ड क्र.4 (वडसा रोड)
ब्रम्हपूरी 441206
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री के. एम. सुंकुरवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (राजस्व)
ब्रम्हपूरी
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर
2) श्री एस. सी. विश्वास
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार
ब्रम्हपूरी
ता. ब्रम्हपूरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.4.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय ब्रम्हपूरी यांचेकडे अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या पडलेल्या घराची नुकसान भरपाई मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 13.5.2008 चे पत्रा नुसार तहसिलदार ब्रम्हपूरी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले दिसून येतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ते वारंवार मागत असतात. अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या पडलेल्या घराची नुकसान भरपाई मिळण्याबाबत माहिती मागत असतात. व तसे त्यांना वेळोवेळी कळविलेले आहे. आयोगाकडे सुध्दा पुर्वी याच संदर्भातील अपीलाचा निर्णय झालेला आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे असेही त्यांनी सांगितले. अपीलकर्ता यांना आयोगापुढे निर्णय झाला आहे काय असे विचारले असता होय असे सांगीतले व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 28.4.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.994–996

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 535/2008.**

श्रीमती विद्या द. नाईक
हरिकृपा संकुल, प्लॉट नं. 63, शहा लेआ>ट
सिंडीकेट बॅंकसमोर, अमरावती रोड,
नागपूर 23. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक
भूमी अभिलेख नागपूर
2) श्री एस. एम. गुंड
जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क्र. 2
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.4.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2008 रोजी नगर भूमापन अधिकारी यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि. 17.3.2008 रोजी माहिती उपलब्ध झालेली नाही. व त्यामुळे दि. 3.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलाशामध्ये दि. 21.4.2008 रोजी निर्णय दिला असून सदरचा निर्णय दि. 23.4.2008 रोजी अपीलकर्ता यांना पाठविलेला दिसून येतो.

3. अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज हा योग्य त्या नमुन्यामध्ये दाखल केलेला नाही व माहिती अधिकारी यांना माहिती अधिकारी म्हणून दाखल केलेला नाही. ज्याप्रमाणे अधिनियमाच्या तरतुदी हया शासकीय कार्यालयाला लागू आहेत तशा त्या अपीलकर्ता यांनासुध्दा लागू असतात. व त्यांनी सुध्दा तेवढयाच काटेकोरपणे त्या तरतुदी पाळणे आवश्यक असते. असे असले तरी अपीलकर्ता यांना दि. 17.3.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावरुन अपीलकर्ता यांच्या अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती कारवाई करण्याची मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) मध्ये ''माहिती'' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेख, दस्तऐवज, टिपणी इत्यादी माहिती उपलब्ध असेल त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारची कारवाई करुन मागणे याबद्यलचे प्रश्न विचारणे अभिप्रत नाही. वास्तविक याच संदर्भात अधिक्षक भूमी अभिलेख यांनी दि. 7.2.2008 रोजी अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अधिकारातील अपील अर्ज दि. 10.12.2007 च्या संदर्भात निर्णय दिलेला दिसून येतो व तो निर्णय स्वयंस्पष्ट आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्याप्रमाणे कारवाई करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे न करता

अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2008 रोजी कोणत्याही प्रकारची माहिती न मागता कारण विचारलेले आहे. जे वर नमुद केल्याप्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 28.4.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.997–999

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 467/2008.**

श्री कुवरलाल सुकराम सेवईवार
मु. ब्राम्हणी पो. गिधाडी
ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री चंद्रकांत महादेवराव खंडाळकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (स व सु)
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. गोंदिया
जुने पावर हा>स रामनगर गोंदिया
2) श्री आनंद ना. हुकरे
जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. तेढा
ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.4.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.5.2008 रोजी कनिष्ठ अभियंता तथा माहिती अधिकारी तेढा महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. यांचेकडे विद्युत कनेक्शन मिळण्याच्या संदर्भात डिमांड भरुन 11 महने झाले. तरी पण विद्युत कनेक्शन मिळाले नाही. माहिती पाहिजे. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी कनिष्ठ अभियंता यांना माहिती अधिकारी म्हणून मागितलेली असल्यामुळे व ते माहिती अधिकारी नसल्यामुळे त्यांना माहिती दिली नाही असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 13.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून होते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 15.7.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी जरी कनिष्ठ अभियंता यांना माहिती अधिकारी म्हणून मागितलेली असली तरी सदरचा अर्ज हा माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर करावयास पाहिजे होता असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व त्यामुळे कनिष्ठ अभियंता हे माहिती उपलब्ध करुन न देण्यास जबाबदार आहेत. प्रथम अपीलात सुध्दा जी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये कोणत्याही प्रकारे समाधानकारक असे उत्तर दिलेले दिसून येत नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचा निर्णय हा चुकीचा निर्णय आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अपीलकर्ता यांना न्याय मिळेल अशा प्रकारे कार्यवाही केलेली नाही व त्यामुळे सदरच्या प्रकरणी तत्कालीन कनिष्ठ अभियंता यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास अडथळा आणला व त्यामुळे त्यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 7.5.2008 च्या अर्जाप्रमाणे तपशिलात सविस्तर अशी माहिती उपलब्ध झालेली / करुन दिलेली असल्यामुळे छायांकीत प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादण्यात येईल.

2) कनिष्ठ अभियंता यांनी सदरचा अर्ज अधिनियमाच्या कलम 6 (3) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतर न केल्यामुळे अपीलकर्ता यांना 30 दिवसांत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे कनिष्ठ अभियंता यांना धनियमाच्या कलम 5 (4) (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही अधिक्षक अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. गोंदिया यांनी करावयाची आहे.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **अधिक्षक अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. गोंदिया** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.4.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1000–1002

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 472/2008.**

श्री रमेश वामनराव हुकरे
प्लॉट नं. 24 इंद्रनगर न्यू नरसाळा रोड
व्हाया म्हाळगीनगर पोष्ट ऑफीस नागपूर 34 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सु. मु. बाविस्कर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय अधिक्षक कृषी अधिकारी
विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय
नागपूर विभाग नागपूर
2) श्री ए. एन. शेंडे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. प्रशासन अधिकारी
विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.4.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक यांचे कार्यालयात लैंगिक छळवादा बाबत केलेली तक्रारीची पुर्ण प्रत (श्रीमती रिनाजी डोंगरे यांनी खात्याला केलेली तक्रार).

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 31 मे 2008 रोजी तक्रार संदर्भात चौकशी अधिका–याकडे चौकषी दिली असल्यामुळे तूर्त माहिती देता येत नाही. तूर्त आपला अर्ज खारीज करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी त्यांनी दि. 17.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 30.6.2008 रोजी अधिनियमच्या कलम 8 (छ) नुसार तक्रारीची प्रत आपणास देता येणार नाही. आपला अर्ज व अपील खारीज करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला आहे. खुलाशामध्ये सदर तक्रार महिला कर्मचारी यांनी केलेली असून त्यावर 12 अधिकारी कर्मचारी यांच्या स्वाक्ष–या आहेत. तसेच सदर कर्मचा–याचा पूर्वेतिहास बघता यापूर्वी त्यांनी दारु पिवून आमरस्त्यावर शिवीगाळ व मारपीट केल्याची नोंद त्यांचे सेवापूस्तकात आहे. तसेच यापूर्वी त्यांचे कामाचे संदर्भात तालूका कृषी अधिकारी लाखांदूर येथील मजगी कामात पैशाच्या अपहारप्रकररणी निलंबित करण्यात आले होते. त्यामुळे तक्रार करणारी महीला कर्मचारी व तक्रारीवर स्वाक्षरी करणारे अधिकारी कर्मचारी यांचे जिवीतास किंवा शारिरीक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल व त्यामुळे अधिनियमच्या कलम 8 (छ) नुसार सदर तक्रारीची प्रत आपणास देता येणार नाही असे त्यांना कळविण्यात आले होते. याबाबत अपीलकर्ता यांनी असे सांगितले होते की त्यांना

तक्रारीची प्रत मिळणे हा त्यांचा हक्क आहे. त्यावर श्रीमती रिनाजी डोंगरे यांचे तक्रारीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांचे वर्तनाबद्यल सखोल अशी तक्रार त्यांनी केलेली दिसून येते. तक्रारीची प्रत त्यांना द्यावयास हरकत नव्हती परंतु त्यावर 12 कर्मचा–यांच्या सहया असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना ज्या करणास्तव माहिती उपलब्ध करुन दिली नाही ते कारण योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.4.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1003–1005

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 600/2008.**

श्री युवराज यशवंतराव हुमने
मोदी पडाव कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. बी. भालेराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
उपविभाग कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री एस. आय. भोयर
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.4.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी श्री भालेराव यांचेकडे एकुण 4 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 23.5.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 28.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.7.2008 रोजी देण्यात आलेला असून अपील अर्जात नमुद मुद्यावरील माहिती अर्जदाराना देण्यात आली व अपील निकाली काढण्यात आले असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की पोलीस आरोपीचे व साक्षदाराचे बयाण कोणत्या नियमाप्रमाणे घेतात 7 मुद्यांवर माहिती मला उपलब्ध करुन दिली नाही. सदरची माहिती पोलीस मॅन्युअल मध्ये आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु पोलीस मॅन्युअल हे बाजारात विकत मिळत नसल्यामुळे त्याबद्यलची माहिती त्यांना नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांनी विचारलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पोलीस मॅन्युअलमध्ये असलेल्या तरतुदीच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 16.4.2008 च्या अर्जात दिलेल्या प्रमाणे माहितीच्या संदर्भामध्ये पोलीस

मॅन्युअलच्या छायांकीत प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1006–1008

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 602/2008.**

श्री धनेज तेजवंतराव पोटदुखे
जटपुरा वार्ड क्र. 1, नगीनाबाग रोड
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
चंद्रपूर
2) श्री सुनिल मा. साकुरे
जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य
सरदार पटेल समाजकार्य महाविद्यालय
मोरवा चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.4.2008 रोजी माहिती अधिकारी सरदार पटेल समाजकार्य महाविद्यालय यांचेकडे एम एस डब्लू भाग 2 च्या सन 2007–08 ची संपूर्ण वर्षभराची प्रत्येक विषयानुसार (टक्केवारीसह) संपूर्ण विदयार्थ्यांची हजेरीपटलाची सत्यप्रत माहिती देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक निरंक रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 28.5.2008 रोजी माहिती देण्यात यावी असे माहिती अधिकारी यांना आदेश दिलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दि. 5.4.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.4.2008 रोजी माहितीच्या साक्षांकीत प्रती एकुण 29 प्रत रु. 2 प्रमाणे एकुण रु. 58/– चा भरणा करुन महाविद्यालयात कार्यालयीन वेळेत येवून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 15.5.2008 रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना सदरची पत्रे मिळालेले नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी यु पी सी ने सदरची पत्रे पाठविलेली आहेत असा पुरावा आयोगापुढे सादर केला व त्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहितीच्या खर्चाकरीता अतिरिक्त खर्च रु. 58/– हे कळविण्यात आलेले होते असा निष्कर्ष काढावा लागतो. अर्थात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली असती तर त्याच वेळेस याबद्यलचा निर्णय झाला असता परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन झालेले आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी शासन निर्णयाचा सुध्दा भंग केलेला आहे. अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यावर त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.5.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1009–1011

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 598/2008.**

श्री धमेंद्र अंकुश शेरकुरे
मु. पो. चिनोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे सन 2005–06, 2006–07 या कालावधीतील केंद्र व राज्य शासनाकडून येणारा विविध योजनावर होणारा निधी किती जमा व खर्च झाला आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना मिळालेल्या योजनाची दस्तऐवज याबद्यलची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 23.5.2008 ला माहिती तयार आहे असे पत्र दिले परंतु अपीलकर्ता हे माहिती घेण्यास आले नसल्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता आली नाही. तसेच अपीलकर्ता यांनी दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सादर केलेले आहे. परंतु ते त्यांच्या आईचे प्रमाणपत्र आहे. अपीलकर्ता यांचे वय 22 आहे असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे ते स्वतंत्र आहे. त्यानंतर दि. 20.8.2008 रोजी अपीलकर्ता यांना त्यांचे बीपी एल कार्ड त्यांचे नावाने नसल्याने माहितीचा खर्च मनिऑर्डरने पाठवावा असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दि. 29.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. व दि. 31.7.2008 रोजी द्वतीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहिती ही व्यापक प्रमाणात होती व तसे त्यांना दि. 23.5.2008 रोजी कळविण्यात आलेले होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा असे सांगितले की त्यांचेकडे ज्या ज्या योजना येतात त्या सर्व योजनांची माहिती ही प्रत्येक वेळेस नोटिस बोर्डवर लावण्यात येते. अशा वेळेस पुन्हा प्रत्येक वेळेस माहितीच्या अधिकारात ही माहिती देणे सुसंगत आहे किंवा नाही हा निर्णय घेता येत नाही व त्यामुळेच ही माहिती संकलीत करुन देण्यास विलंबा होतो. माहिती तयार आहे असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.5.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1012–1014

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 605/2008.**

श्री महादेव श्रावण पापडे
अभ्यंकर वार्ड वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त नगर पालिका प्रशासन नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.12.2007 रोजी जन माहिती अधिकारी मुख्याधिकारी नगर परिषद यांचेकडे एकुण 5 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.1.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 17.1.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 14.2.2008 रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व अपीलार्थीस न पुरवलेला विद्युत ना हरकत दाखला संबंधी अर्जाचा शोध घेवून अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावा असा आदेश देवून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती मिळाली नाही या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना छायांकीत प्रती उपलब्ध करुन दिल्या आहेत परंतु त्या छायांकीत प्रती मुळ करारनाम्याच्या नाहीत तसेच इतर प्रती हया वाचनीय नसल्यामुळे टंकलेखन करुन त्यावर सत्यप्रत नमुद करुन देण्यात आलेली आहे. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे ज्या साहित्याच्या सवरुपात उदा. अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे टिपण्या इत्यादी स्वरुपात उपलब्ध असतील त्यांच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. व त्यामुळे टंकलेखित करुन दिलेल्या प्रती ही सत्यप्रत होवू शकत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांना मुळ जी कागदपत्रे असतील त्यांच्या छायांकीत प्रती ''माहितीच्या अधिकारात दिल्या'' अशा प्रकारे प्रमाणीत करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या दस्तऐवजाच्या प्रती ''माहितीच्या अधिकारात उपलब्ध करुन दिल्या'' अशा प्रकारे प्रमाणीत करुन हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तीशः द्याव्या. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी

यांचे कार्यालयात संपर्क साधून व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी. व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1016–1018

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 617/2008.**

श्री सुरेश शालिकराम दुरुगकर

श्रीनगर गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया

2) जन माहिती अधिकारी तथा

नगर परिषद कार्यालय गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.3.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून नगर परिषद गोंदिया यांचेकडे सन 1949 पासून 2008पर्यंत सार्वजनिक विहीरीचे व संडास व मुत्रीघर चे स्थळ व बोरींग किती फिट खोदकाम दिनांकासहीत अशी माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना अपुर्ण माहिती उपलब्ध झाली म्हणून दि. 2.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व अपुरी माहिती दिल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. आज जन माहिती अधिकारी हे हजर नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत व त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली पण अपुर्ण उपलब्ध झाली असे आयोगापुढे सांगितले. त्यांना माहिती पुर्ण उपलब्ध झालेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या नोटिसेसची दखल न घेतल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी व त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत **प्रादेशिक संचालक नगर परिषद नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1019.1020

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 616/2008.**

श्री सुरेश शालिकराम दुरुगकर
श्रीनगर गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दिघोरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिल कार्यालय गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.3.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी अन्न पुरवठा विभाग तहसिल कार्यालय गोंदिया यांचेकडे अन्न पुरवठा शहरी विभाग निरीक्षक साहेब किती चौकशी केलेली आहे व राशन दुकानदार व केरोसीन धारक याची संपुर्ण माहिती. माहितीचा कालावधी 1 एप्रिल 2007 31 मार्च 2008पर्यंत संपुर्ण माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की श्री एस.जी.शर्मा अ.का. अन्न तहसिल कार्यालय गोंदिया यांना पत्र देण्यात आले परंतु अ.का. यांनी माहिती मुदतीच्या आत सादर केली नाही. त्यानंतर अ.का. यांना दि.2.6.2008 रोजी पत्र पाठविले परंतु त्यातही त्यांनी लेखी पत्र सादर केले. त्यात त्यांनी मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सुध्दा दाखल केले होते. त्यानंतरच अ.का. यांनी तहसिलदार यांना माहिती सादर केलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी मोघम माहिती मागितलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की अन्न निरीक्षकानी जे प्रस्ताव पाठविलेले असतात ते प्रस्ताव हे जिल्हाधिकारी यांचेकडे मान्यतेकरीता पाठविण्यात येते त्यामुळे सदरची माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. परंतु पुरवठा निरीक्षकाच्या कामाच्या दैनंदिनी मागितली असल्यास ती पुरविता येईल मात्र अपीलकर्ता यांनी कोणत्याही स्वस्त धान्य दुकानाची कागदपत्रे मागितलेली नसल्यामुळे तशी माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही व तसे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यात कोणत्याही प्रकारे निश्चित असे वर्णन नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना पुरवठा निरीक्षकाची कामाची दैनंदिनी उपलब्ध करुन देणे याबाबत त्यांनी मान्यता दिली व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.3.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने पुरवठा निरीक्षकाच्या कामाच्या दैनंदिनी च्या छायांकीत प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी पुरवठा निरीक्षक यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता विहित मुदतीत पत्र दिले असले तरी पुरवठा निरीक्षक यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **तहसिलदार गोंदिया** यांनी करावयाची आहे

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1021–1023

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे्त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 612/2008.**

श्री उज्वलकुमार वासुदेवराव बागडे
सावनेर वार्ड क्र. 17
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक
(माध्यमिक शिक्षण विभाग)
जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.3.2008 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे सारस्वत पब्लिक स्कुल सावनेर द्वारे परवानगीचे वेळी सादर केलेले जमिनी हक्काबाबत व इतर कागदपत्रांची प्रतिलिपी व माहिती मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 24.4.2008 रोजी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक हे स्वतः माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे अधिकार वापरलेले दिसून येत नाही. व त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचेविरुध्द रु0 25000/- ची शास्ती लादणे आवश्यक झाले आहे. परंतु आज माहिती अधिकारी हजर नसल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकुन घेता येत नाही व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 26.3.2008 च्या अर्जा अनुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. अन्यथा विद्यमान जन माहिती अधिकारी सुध्दा शास्तीस पात्र राहतील.

2) जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा व तसे न केल्यास त्यांचेविरुध्द शास्ती कायम होईल.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1024-1026

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 639/2008.**

श्री वामन काशीनाथजी हेंडवे
मु. पो. रसुलाबाद ता. आर्वी
जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.5.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.8.2007 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते ती खालीलप्रमाणे.

रा.मा.क्र./एलएनडी/18/212/05–06 सदर प्रकरणातील कसूरदार अधिका–यासह गैरअर्जदारावर दि. 19.6.2007 आणि दि. 6.7.2007 ला दिलेल्या माझ्या तक्रार अर्जावर कार्यालयाने केलेल्या कारवाईची अथवा न केलेल्या कारवाईची माहिति मिळण्याबाबत.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 21.9.2007 रोजी कोणत्याही प्रकारचा बोध होत नाही व खुलासा करावा असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा न करता दि. 4.2.2008 प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. द्वितीय अपीलात सुध्दा अपीलकर्ता यांनी तक्रार अर्जावर कार्यालयानी केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. वास्तविक अपीलकर्ता यांना दि. 18.5.2007 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांची तक्रार मुळात ही उपविभागीय अधिकारी यांनी भोगवटदाराच्या संदर्भात जे आदेश दिलेले आहेत त्याबाबत ते दिलेले दिसून येते. अर्थात त्याबाबतची कार्यवाही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अभिप्रत नाही. अपीलकर्ता यांना तक्रार असेल तर त्यांनी महाराष्ट्र जमीन महसुल संहिती यातील तरतुदीप्रमाणे वरीष्ठ अधिका–याकडे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. व तशी मागणी त्यांनी या माहितीच्या अर्जात केलेली असल्यामुळे त्यांना दि. 21.9.2007 रोजीचे पत्र दिलेले दिसून येते. व त्याबाबत त्यांनी कोणताही खुलासा आयोगापुढे सुध्दा केलेला नाही त्यामुळे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांची विनंती मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1027–1029

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 642/2008.**

श्री नानाजी जैदास रामटेके
रा. जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एच. जी. सुपके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती अर्जुनी/मोर.
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया
2) श्री पी. आर. चौधरी
जन माहिती अधिकारी तथा
सचिव
ग्रामपंचायत जानवा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.3.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून सरपंच ग्रामपंचायत जानवा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा जानवा येथील दलित सुधार वस्ती योजने अंतर्गत केलेल्या रोड बांधकामाच्या इस्टीमेटची, नकाशाची व बांधकाम ठेका किती हजार रुपयात झाला त्याबाबतची नक्कल खाजगी कामाकरीता मिळण्याबाबत.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 2.4.2008 रोजी माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना स्वतः ठेका मिळाला नाही व त्यामुळेच त्यांना प्रथम अपील करावे लागले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 7.7. 2008 रोजी देण्यात आलेला असून निर्णय दिलेला दिसून येतो. यावरुन अपीलार्थीना कार्यालयात उपलब्ध झालेली माहिती पुरविण्यात आलेली आहे व त्यामुळे प्रथम अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 5.3.2008 च्या अर्जाप्रमाणे झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1030–1031

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 643/2008.**

श्री नानाजी जैदास रामटेके
रा. जानवा पो. इटखेडा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एच. जी. सुपके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती अर्जुनी/मोर. जि. गोंदिया
2) श्री महेंद्र श्रावण नंदागवळी
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जानवा
ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.3.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जानवा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा जानवा येथील जि.प.प्राथमिक शाळा वर्ग खालीच्या बांधकाम ठेक्याची, नकाशाची, इस्टीमेटची नक्कल खाजगी कामाकरीता मिळण्याबाबत.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 9.4.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन आलेली होती. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 15.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली असली तरी स्वतःला ठेका मिळाला नाही याबद्यलची त्यांची तक्रार आहे व त्यामुळे ज्या पध्दतीने ठेका देण्यात आला आहे त्या पध्दतीवर आक्षेप दिसून येतो. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे जी प्रक्रिया झालेली आहे त्या प्रक्रियेच्या तक्रारीची चौकशी व्हावी किंवा करावी अशा प्रकारची तरतुद अधिनियमात नसल्यामुळे अपीलकर्ता यांना ठेका मिळाला नाही याबद्यलची चौकशी करता येणार नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन झालेली आहे ती योग्य आहे असे दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे योग्य त्या सक्षम अधिका–याकडे तक्रार करुन त्यांनी न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1032–1034

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 641/2008.**

श्री हगरु राघो कापगते
रा. पो. सेंदूरवाफा
ता. साकोली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री संदीप पालवे
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन डुग्गीपार
ता. सडक अर्जूनी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. उपविभागीय अधिकारी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली दिसून येतात.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2006 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून पोलीस इन्स्पेक्टर यांचेकडे दिनांक 26.10.2006 रोजी दिलेल्या रिपोर्टची काय कारवाई झाली त्याची माहिती हवी आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने माहिती संकलीत करण्यासाठी ठाणेदार डुग्गीपार यांना दि. 26.4.2008 रोजी पत्र दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दि. 17.5.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती दिलेली दिसून येते. व पत्र प्राप्त झाल्याबाबत अभिलेखावरील आवक रजिष्टरमध्ये दि. 18.5.2008 प्रमाणे नोंद केल्याचे दिसून येते असा खुलासा दाखल केलेला आहे. वास्तविक जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अर्जदार प्रभुदास हगरु कापगते यांचे रिपोर्ट प्रमाणे गैरअर्जदार गोविंदा मानु मुंगमोडे यांचे बयाण घेतलेले आहे. व गैरअर्जदार यांना कलम 149 सी.आर.पी.सी.अन्वये नोटीस दिली आहे. व त्याप्रमाणे ठाणेदार यांचा चौकशी अहवाल प्राप्त आहे. अपीलकर्ता यांना जरी माहिती पाठविण्यात आलेली असली तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही. तसेच अपीलकर्ता यांनी आयोगापुढे चौकशी करुन कारवाई करावी अशा प्रकारची विनंती केलेली आहे. वास्तविक अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध झालेली आहे. ही बाब त्यांच्या दि.18.8.2008 च्या आयोगापुढील द्वितीय अपीलात दिलेली आहे. तरीसुध्दा त्यांनी आयोगापुढे सांगितले की त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. यावरुन चौकशी करुनच कारवाई करावी अशी त्यांची अपेक्षा दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात चौकशीचे आदेश देता येत नाही. झालेल्या घटनाबद्यलची माहिती उपलब्ध करुन देता येते व ती अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली आहे. हे त्यांच्या अपील मेमोवरुन स्पष्ट होत आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांची विनंती मान्य करता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास / पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना जशी घटना घटलेली आहे तशी माहिती पुरविलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1035–1037

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 638/2008.**

श्री सुनिल पांडुरंगजी पारिसे
के.ऑफ सौ. मिनाक्षी पारीसे
स्टेट बॅकेसमोर, सावने
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव
श्री गणेश प्रासादिक शिक्षण संस्था
पाटणसावंगी (आदर्श विद्यालय)
ता. सावनेर जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
आदर्श विद्यालय पाटणसावंगी
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी तर्फे ॲड. प्रशांत ठाकरे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.3.2008 व दि. 16.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी मुख्याध्यापक यांचेकडे एकुण 22 व 10 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 16.4.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 24.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलात त्यांनी पुन्हा तीच माहिती मागितलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 4.7.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच दि. 15.5.2008 रोजी सुध्दा दि. 16.4.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांचेविरुध्द तीन वेळा विभागीय चौकशी करण्यात आली होती व ती स्थगीत करण्यात आलेली आहे. व त्यानंतर त्यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल झाल्यामुळे त्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले आहे व त्यामुळेच ते अनेक अर्जामधून माहिती मागत असतात. पुर्वी सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व ते पुन्हा तीच माहिती मागत असतात. त्याकरीता संस्थेच्या सचिवांनी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे व त्या प्रतिज्ञापत्रामध्ये सेवेच्या कालावधीतील त्यांची वागणूक याबद्यलचे कथन केलेले आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दि. 4.7.2008 रोजी पूर्ण माहिती दिली नाही त्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे पत्र दिलेले होते परंतु त्यानंतर कागदपत्रे त्यांना मिळालेली नाहीत. सुनावणीच्या वेळेस मात्र त्यांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्र दाखल केलेले नाहीत व त्यांच्या अर्जातील मुद्या क्र. 12 व तसेच इतर मुद्यावरील माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. त्यामुळे अपीलकर्ता यांना दि. 4.7.2008 रोजीच्या पत्राप्रमाणे जी माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध

झालेली नसेल ती माहिती त्यांनी पुन्हा जन माहिती अधिकारी यांचेकडे साध्या अर्जाने कळविल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. किंवा अपीलकर्ता यांनी जर माहिती उपलब्ध झाली नाही असे पत्र दि. 4.6.2008 च्या उत्तरानंतर दिले असेल तर त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 4.7.2008 रोजीची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे त्यामध्ये त्यांनी दिलेल्या पत्राप्रमाणे जर माहिती उपलब्ध झाली नसेल तर पुन्हा त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकीत प्रतीच्या स्वरुपाती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. व तसे पत्र दिले नसल्यास हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना अपीलकर्ता त्यांनी कोणत्या प्रकारची माहिती मिळाली नाही तेवढेच मुद्दे कळवून माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1038–1040

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 654/2008.**

श्रीमती लिलाबाई मोतीलाल बरबटे
श्रीमती ताराबाई मनोहरराव महादुले
द्वारा डॉ. प्रदिप महादुले समीउल्लाह खॉ मार्ग
गांधी चौक सदर नागूपर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त आयुक्त
महानगर पालिका नागपूर
2) श्री आर. व्ही. वारके
जन माहिती अधिकारी तथा
वार्ड अधिकारी (मंगळवारी झोन)
महानगर पालिका मंगळवारी झोन
सदर नागूपर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. मनोज बरबटे हे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी सहा. आयुक्त महानगर पालिका यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

दिनांक 29.8.2007 रोजी आपल्या झोनला दिलेल्या अर्ज ज्यामध्ये घर क्र. 326 आणि 326/अ वार्ड क्र. 67 सदर गांधीचौक नागपूर सिटी सर्वे नंय 1340 सिट क्र. 13 मौजा सिताबर्डी नागपूर येथील घर पडक्या स्थितीत असल्यामुळे माहिती त्याप्रमाणे त्यावर उचीत कारवाई करण्याबाबत विनंती केली होती त्याचप्रमाणे यापूर्वी दि. 1.8.2003 तथा 13.10.2003 च्या अर्जावर कारवाई का करण्यात आली नाही. हया बद्यल विचारणा केली होती. वरील दि. 29.8.2007 रोजी केलेल्या अर्जावर आजच्या तरखेपर्यंत कोणतीही कारवाई किंवा त्यासंबंधी निर्णय घेण्यात आलेल नाही किंवा घेण्यात आलेला असल्यास त्याबद्यल अर्जदारांना सुचीत करण्यात आलेला नाही.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 16.8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 1.9.2008 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांचे तर्फे प्रथम अपीलाच्या सुनावणीस कोणीही हजर नव्हते व त्यामुळे अपीलार्थीस विभागाने 8 दिवसात माहिती द्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. आजही सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतू जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की दिलेल्या पत्यावर दि. 4.9.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला होता परंतु सदरच्या पत्यावर कोणीही राहात नाही अशा प्रकारचा शेरा लिहुन उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती परत कार्यालयात आणलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्या ठिकाणी रहीवास आहे व आयोगाची नोटिस

सुध्दा अपीलकर्ता यांना त्याच पत्यावर मिळाली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी रहिवास आहे असेही स्पष्ट होते व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हे सिध्द होते. त्यामुळे अपीलकर्ता यांच्या दि. 13.6.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा संबंधित कर्मचारी किंवा अधिकारी हे दोषी आढळुन येतात. व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 13.6.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 13.6.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत कलम 7 (1) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी किंवा कर्मचारी हे दोषी आढळुन येतात. त्याबाबतची जबाबदारी निश्चित करुन जबाबदारी निश्चित झालेल्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे विरुध्द रु. 5000/– ची शास्ती लादण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी हे हजर असल्यामुळे त्यांचे शास्तीच्या संदर्भात म्हणणे एकुन घेतलेले आहे.

3) सदरच्या शास्तीची अंमलबजावणी आयुक्त महानगर पालिका नागपूर यांनी करावयाची असून त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत **आयुक्त महानगर पालिका नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी. सदरची रक्कम

वसुल झाल्यानंतर लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1041–1044

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 650/2008.**

श्री प्रभाकर हिरामण जुनघरे
ह. मु. नवि मंगळवारी, मेहंदीबाग रोड
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. व्ही. भालेराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
कामठी विभाग
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री बिजवे
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस स्टेशन अधिकारी
पोलीस स्टेशन मौदा
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**
वर्धा भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली

**( आदेश पारित दिनांक 8.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.5.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.4.2008 व 12.5.2008 रोजी माहिती मागण्यासाठी दोन अर्ज दाखल केले होते. दोनही अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 11.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय देण्यात आलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

उपरोक्त संदर्भीय व विषयास अनुसरुन सादर आहे की अपीलकर्ता अर्जदार यांचेकडून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत दाखल झालेल्या 2.9.2008 चे द्वितीय अपील अर्जामध्ये दि. 11.6.2008 रोजी प्रथम अपील अर्जाची सुनावणी दि. 6 ऑगस्ट 2008 रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी यांचे कडुन घेण्यात आली असता संदर्भानुसार माहिती मिळाली नाही असे नमुद आहे.

वरीलप्रमाणे अपीलकर्ता अर्जदार यांचे अपील अर्जात नमुद असुन त्या अनुषंगाने खुलासा सादर आहे की अपीलार्थी प्रभाकर हिरामण जुनघरे नागपूर यांनी दि. 11.6.08 रोजी या कार्यालयात व्यक्तीशः माहितीचे अधिकारा अंतर्गत पोलीस निरीक्षक तथा माहिती अधिकारी पो.स्टे. मौदा यांना दिलेल्या दि. 12.5.2008 चे माहितीचे अर्जावर प्रथम अपील अर्ज सादर केला त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक तथा माहिती अधिकारी पो.स्टे. मौदा यांचे कडुन अपीलकर्ता अर्जदार यांचे अपील अर्जात नमुद करण्याबाबत माहीती प्राप्त करण्यात आली व अपीलार्थी हे पोलीस बिनतारी संदेश विभाग कॅम्प देवरी जि. गोंदिया येथि विजतंत्री चे. पदावर कार्यरत असल्याने त्यांनी अर्जात नमुद केलेल्या मोबाई

क्र. 9423679075 वरुन सुनावणी तारखेवर हजर होण्याबाबत वारंवार सुचना देण्यात आली परंतु अर्जदार हजर झाले नाही व स्वमर्जीने दि. 6.8.2008 रोजी या कार्यालयात हजर आल्याने त्यांचे अपील अर्जाची सुनावणी मध्ये त्यांनी निवेदनात सांगीतले की दि. 12.5.08 रोजी पो.स्टे. मौदा येथे माहितीचे अधिकारा अंतर्गत अर्ज दिल्यावर त्या अनुषंगाने पो.स्टे. मौदा येथून दि. 9.6.08 रोजी माहितीचे पत्रान्वये कळविण्यात आले. परंतु पुर्ण कागदपत्रे प्राप्त झाले नाही. नायब तहसिलदार मौदा श्री बी.डी.टेळे आणि पो. हवा.कामठे पो.स्टे. मौदा यांचे माहितीचे पत्रान्वये कळविण्यात आले असल्याने मला यांचे बयानाचा आग्रह नाही. परंतु पोलीस पाटील आष्टी आणि सरपंच आष्टी यांचे बयाणांची प्रत दि. 12.5.08 चे माहितीचे अधिकारा अंतर्गत अर्जाप्रमाणे प्राप्त झाले नाही.

वरील प्रमाणे अपीलार्थी यांचे निवेदनानुसार त्याच वेळी माहिती अधिकारी पो.स्टे. मौदा यांना दुरध्वनीवरुन विचारणा करण्यात आली असता त्यांनी सांगीतले की पोलीस पाटील आष्टीचा बयाण घेण्यात आला नाही. म्हणुन अर्जदारांना बयाण उपलब्ध करुन देता आला नाही यावरुन सुनावणीमध्ये पोलीस निरीक्षक पो.स्टे. मौदा यांची माहीती देवून अपीलार्थी यांना माहिती अधिकारी यांनी त्वरीत लेखी माहीती देण्याचे निर्देश देवून अपील अर्जाचा निपटारा करण्यात आला.

सदर प्रथम अपील अर्जासंबंधाने माहिती अधिकारी पो.स्टे. मौदा यांचे कडुन प्राप्त कागदपत्रावरुन द्वितीय अपील अर्जात नमुद माहीतीचा तपशीलमध्ये मुद्या क्र. 1 मध्ये नमुद श्री बी.डी.टेळे नायब तहसिलदार मौदा यांचे बयाण घेण्यात आले नाही. करीता अर्जदारास बयाण उपलब्ध करुन देता आले नाही.

2. पोलीस पाटील श्री गुलाब श्रावणजी मेहर रा. नवेगाव आणि सरपंच श्री शामराव दयाराम मेहर रा. नवेगाव यांचे बयाणाची प्रत अर्जदाराना माहिती अधिकारी पो. स्टे. मौदा तर्फे मा.पोलीस अधिक्षक ना.ग्रा. यांचे कार्यालयीन मार्फतीने देण्यात आले होते.

3. हेड.कॉ. 1556 अमरदीप कामठे हे अर्जदाराचे प्रकरणात चौकशी अंमलदार

असुन त्यांनी गैरअर्जदार कृष्णी मोतीराम पाटील व इतर 1 यांचे विरुध्द इस्ते क्र. 8/2008 कलम 107,116 जा.फौ.अन्वेय प्रतिबंधक कार्यवाही केली आहे. करीता तयांचे बयाण घेण्याची आवश्यकता नसल्याने अर्जदारांना बयाण उपलब्ध करणे शक्य झाले नाही.

वरील प्रमाणे अर्जदारांचे द्वितीय अपील अर्जामध्ये नमुद मुदयानुसार कार्यवाही झालेली असुन आम्ही प्रथम अपील अर्जाबाबत दि 6.8.08 रोजी या कार्यालयात घेण्यात आलेल्या सुनावणीमध्ये अपीलार्थ्री यांनी श्री बी.डी.टेळे नायब तहसिलदार मौदा आणि पो. हवा. 1556 अमरदीप कामठे यांचे बयाण उपलब्ध नसल्याने त्यांचे बयाणाचा आग्रह नाही असे नमुद करुन सुध्दा पुन्हा त्यांचे बयाणाची मागणी केलेली आहे.

अर्जदार प्रभाकर हिरामण जुनघरे नागपूर यांनी त्यांचे शेतीचे प्रकरणाबाबत पो. स्टे. मौदा येथे 7.1.08 रोजी दिलेल्या तक्रारीवर मौदा पोलीसांनी अदखलपात्र गुन्हयाची नोंद करुन अर्जदारांना अदखलपात्र गुन्हयाची सुचना पत्र देवून यातील गैरअर्जदार 2 इसमांवर प्रतिबंधक ार्यवाही केली. त्या अनुषंगाने अर्जदारांनी पोलीस अधिक्षक ना.ग्रा. यांना दिलेला दि. 10.4.08 चा अर्ज पो.स्टे. मौदा येथे दि. 15.4.08 रोजी प्राप्त झालेवरुन अर्जात नमुद माहिती व माहीतीचे कागदपत्रे दि. 28.4.08 रोजी पोलीस अधिक्षक ना.ग्रा. यांचे कार्यालयात सादर करण्यात आले व अर्जदारांना त्यांचे कार्यालयाकडुन देण्यात आले. अर्जदारांनी माहितीचे अधिकारा अंतर्गत पुन्हा त्याच मुदयावर 12.5.08 रोजी या कार्यालयात व्यक्तीशः माहितीचे अधिकारा अंतर्गत अर्ज सादर केल्याने सदर चा अर्ज पो. नी. मौदा तथा माहिती अधिकारी पो.स्टे. मौदा यांचे कडुन दि. 10.6.08 रोजी मुदतीचे आंत अर्जदारांना माहीतीचे पत्र देण्यात आले होते.

अर्जदारांचे माहीतीचे अर्ज व प्रथम अपील अर्जाबाबत मुदतीचे आंत माहिती व माहीतीचे कागदपत्रे तसेच प्रथम अपील अर्जाबाबत सुनावणी घेण्यात येवून अर्जदाराचे अर्जाचा निपटारा करण्यात आलेला असुन सुध्दा अपीलार्थी अर्जदार हे विनाकारण त्रास

देण्याचे उद्येशाने आपणाकडे द्वितीय अपील अर्ज दाखल केल्याचे अहवालामध्ये नमुद कागदपत्रावरुन आपणास दिसून येईल.

सदरच्या खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती योग्य आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1045–1049

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे्त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 658/2008.**

श्री विलास वामनराव लोहोटे
बी 3/12 बजरंग कॉम्प्लेक्स
सिरसपेठ नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री संदिप जी. दिवाण
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त
ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर
2) श्री व्ही. एम. देशमुख
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. वरील उल्लेखित विषयान्वये आमच्या विरुध्द नोंदविलेले उप. क्र. 3176/01 च्या केसमध्ये आपण माझ्या वरिष्ठांना दिलेले व त्यांच्याकडून आलेलया पत्राच्या सत्यप्रमाणित प्रती देण्याची व्यवस्था करतील हि नम्र विनंती.

2. तसेच आपण पुरावा तपासाच्या कागदपत्रामध्ये काही असल्यास ते देखिल सत्यप्रमाणित प्रतीमध्ये उपलब्ध करुन देतील.

3. तसेच श्री विलास लोहोटे मोटर वाहन निरीक्षक गोंदिया यांनी अपसंपदा जमा केल्याबाबत त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यापूर्वी चौकशीमध्ये निष्पन्न झालेल्या वस्तुस्थितीबाबत आपण (श्रीमान सुभाष पानसे पोलीस निरीक्षक यांनी) माझे म्हणणे का बरे नोंदवून घेतलेले नाही हे देखिल योग्य पुराव्यासह (छायांकित सत्यप्रतीत) कळविण्याची व्यवस्था करतील हि नम्र विनंती.

सदरची माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.4.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 17.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 28.5.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दि. 1.4.2008 रोजी माहिती देण्यात आलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आले असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी लेखी युक्तीवाद सादर केला आहे. तसेच तोंडी युक्तीवाद करतांना दिसून येते. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली

असली तरी त्यांच्या अर्जातील मुद्या क्र. 1 मधील त्यांच्या वरीष्ठांकडून आलेल्या पत्राच्या संदर्भात कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या वरीष्ठांकडून कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार हा झालेला नाही व त्यामुळे त्या पत्रव्यवहाराची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविणे योग्य राहिल. त्याचप्रमाणे मुद्या क्र. 2 मध्ये पुरावा तपासाच्या कागदपत्रामध्ये काही असल्यास असे मोघम विचारलेले दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांचेकडे जो पुरावा उपलब्ध आहे तो सर्व पुरावा न्यायालयामध्ये दाखल केलेला आहे. त्याप्रमाणे सुध्दा त्यांना कळविण्यास हरकत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 6.2.2008 च्या अर्जा अनुषंगाने मुद्या क्र. 1 व 2 च्या संदर्भामध्ये कागदपत्रे असल्यास तसे कळवावे किंवा नसल्यास तसे कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 8.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1050–1052

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 478/2008.**

श्री प्रकाश गंगाधर जुगनाकर
रेल्वे क्वॉ. नं. के 73/बी
अजनी सेन्ट्रल कॉलोनी नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. डी. फेंडरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार नागपूर ग्रामीण नागपूर
2) श्री डि. एम. बढीये
जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार
(ग्रामपंचायत बोथली)
तहसिल कार्यालय नागपूर ( ग्रामीण ) ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.4.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता गैरहजर आहे. अपीलकर्त्याच्या नमूद पत्यावर सुनावणीचे पत्र पाठविण्यात आले असता ते परत कार्यालयात प्राप्त झाले उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी नायब तहसिलदार यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा बोथली गाव (ग्रामपंचायत) बोथली पटवारी हलका नं. 74 सर्वे नं. 60 (74/60) येथील 7/12 ची प्रमाणीत छायांकीत प्रत सन 1960 नंतर ज्यांचे नाव दाखल करण्यात आले त्यांचा नावाचा अभिलेख मुळ चौकशी मसराम यांचे वारस गमाबाई सखाराम कुंभरे त्यांचे वारस श्रीमती लक्ष्मीबाई जुगनवाहके मुलगी श्री बाजीराव सखाराम कुंभरे मुलगा.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांना दि. 30.4.2008 रोजी माहिती देण्यास कळविले होते. घरी नसल्याने नोटिस परत आले व त्यांचे नातेवाईकास दि. 24.9.2008 ला देण्यात आले तरीही अर्जदार माहिती घेण्यात आले नाही असा शेरा दिलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 31.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णयात माहिती देण्याकरीता कळविले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते.

व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती व्यक्तिशः घेणार असे कळविले असल्यामुळे व ते माहिती घेण्यास गेलेले नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 15.4.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1953–1054

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 475/2008.**

श्री गामीनीचंद्र राजाराम चव्हाण
प्लॉट नं. 283, कस्तुरबा नगर
रोड नं. 5 जरीपटका नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त 1
नागपूर महानगर पालिका नागपूर
() ता. जि.
2) श्री व–हाडे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. आयुक्त (झोन अधिकारी)
आसीनगर झोन क्र. 9 (बांधकाम विभाग)
नागपूर महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.4.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त आसीनगर झोन क्र. 9 यांचेकडे प्लॉट क्र. 282 ख. नं. 7 मौजा इंदोरा यांचे अनधिकृत बांधकाम तोडण्याकरीता प्रकरण अतिक्रमण विभागाकडे पाठविले असता कोणत्या आधारावर प्रकरण परत झोन कार्या.ने मागीतले. व या प्रकरणात अतिक्रमण विभागाने किती कार्यवाही केली व किती कार्यवाही बाकी आहे याची दिशेनुसार माहिती.
माहिती स्वतः घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे दि. 27.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 17.6.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 13.6.2008 रोजी घेण्यात आलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द रु. 250/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 22.4.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने तपशीलात कागदपत्राच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टान माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करावयाची

असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **आयुक्त महानगर पालिका नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.4.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1055–1057

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 667/2008.**

श्री चुन्नीलाल नारायण सहारे
प्लॉट नं. 154, राजगृह नगर
नारी रोड नागपूर 26 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद भंडारा
2) श्रीमती एम. एस. ढारे
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका
मंजुळामाता कन्या विद्यालय लाखांदूर
जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडे कु. मंदाकिनी दामोधरपंत कहाळे हीचा शाळा सोडण्याचा दाखला रजिस्टर खारीज प्रमाणे नोंदी करुन जन्मतारखेसह व मागील शाळा नवयुग विद्यालय सोडल्याच्या नोंदीसह प्रमाणीत प्रत मिळावी. कालावधी 1986 ते 1988.

सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 24.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 18.8.2008 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला असून तत्कालीन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास अपीलामधील भाग 1 नुसार माहिती मिळाली परंतु माहिती उशिरा मिहाली असे अपीलकर्त्यानी सुनावणीमध्ये सांगितले. परंतु विषय भाग 2 नवयुग विद्यालय नागपूर येथील शाळा सोडल्याचे प्रमाणपत्राची प्रत अपीलकर्त्यास अजूनपर्यंत मिळाली नाही त्यामुळे माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका मंजुळामाता कन्या विद्यालय लाखांदूर यांनी निर्णयाची प्रत मिळाल्यापासून एक महिन्याचे आत माहिती अपीलकर्त्यास पुरवावी असे आदेश देण्यात आलेले दिसून येते. दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांना दि. 19.7.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. दि. 18.8.2008 ला सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर दि. 22.9.2008 रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

मी अपीलकर्ता शपथेप्रमाणे लिहुन देतो की दि. 29.4.2008 ला कु. मंदाकिनी दामोधरपंत कहाळे हीचा शाळा सोडण्याचा दाखला रजिस्टर खारीज प्रमाणे नोंदी करुन

जन्मतारखेसह व मागील शाळा नवयुग विद्यालय सोडल्याच्या नोंदीसह प्रमाणीत प्रत मिळावी असा माहितीच्या अधिकारात अर्ज केला असता दि. 24.6.2008पर्यंत मान. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका मंजुळामाता कन्या विद्यालय लाखांदूर यांनी माहिती दिली नाही करीता मा. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद भंडारा यांना दि. 24.6.2008 ला अपील केले. त्यानुसार सुनावणी दि. 18.7.08 ला ठेवण्यात आली परंतु मला पोष्टाकडून पत्र दि. 19.7.08 ला मिळाले म्हणून पुढच्या सुनावणीच्या तारखेकरीता विनंती अर्ज केला असता मला वुनवणीचा दि. 6.8.2008 मिळाला. त्यानुसार सुनावणी झाली. मुख्याध्यापिका तथा माहिती अधिकारी यांनी मंजुळामाता कन्या विद्यालय हया शाळेचा दाखल अटॅच कॉपी दिली परंतु प्रमाणित प्रत दिली नाही. यावरुन हा दाखला मला खोटा दाखल दिला हे सिध्द होते. परंतु नवयुग विद्यालय नागपूर हया शाळेचा दाखला मला आजच्या तारखेपग्रंत मिळाला नाही. म्हणून मला माहिती अपूर्ण दिली हे सिध्द होते. नंतर संदर्भ क्र. भंजिप/शिवी/माध्य/1963/08 जि.प.शिक्षण विभाग माध्यमिक जि.प.भंडारा दि. 18.8.2008 असे पत्र मिळाले. त्यामध्ये स्पष्टपणे नमूद आहे की आपल्या पत्रानुसार दस्तऐवज पाहिले असता सदर्हु विद्यार्थीनीची मुळ टि सी व जन्मतारखेचा दाखल आढळून आलेला नाही. नंतर संदर्भ क्र. भंजिप/शिवी/माध्य/1649/08 जि.प.शिक्षण विभाग माध्यमिक जि.प.भंडारा दि. 9.7.2008 असे पत्र मिळाले. त्यामध्ये नमुद आहे की कु. मंदाकिनी दामोधरपंत कहाळे हीचा शाळा सोडण्याचा दाखला आपल्या मागणी अर्जाप्रमाणे आपल्याकडे सादर केलेला आहे. परंतु माझ्या मागणी अर्जाप्रमाणे मुख्याध्यापिकेने दाखला दिलेला नाही. त्यांनी अटॅचड कापी पाठविली. ती सोबत जोडली आहे. तसेच त्यांनी दाखल खारीज रजिस्टरचे सुध्दा झेरॉक्स प्रत पाठविली. यापुवी सुध्दा दाखल खारीज रजिस्टरचे झेराक्स प्रत पाठविली. दोन्ही दाखल खारीज रजिस्टर मध्ये वेगळी वेगळी माहिती आहे म्हणून ही माहिती दिशाभुल करणारी आहे व टी सी ही खोटी पाठविली आहे.

वरील सर्व कागदपत्रावरुन असे स्पष्ट होते की माहिती खोटी दिशाभूल करणारी व अपुर्ण आहे. वरील प्रकरणाचे सर्व कागदपत्राची झेरॉक्स प्रती आपणासमोर मांडत आहे. आपणाला देत आहो. वरील सर्व माहिती ही यांनीच मला दिलेली आहे यावरुन हे सिध्द होते की माहिती खोटी दिशाभूल करणारी व अपुर्ण करणारी आहे. करीता हे लिखीत मी स्वतःचे प्रतिज्ञापत्र सादर करीत आहे.

तसेच युक्तीवाद करतांना सुध्दा अपीलकर्ता यांनी आयोगाचे सदरच्या दोन प्रकारच्या छायांकीत प्रती निदर्शनास आणल्या आहेत. यावरुन अपीलकर्ता यांचे म्हणणे मध्ये तथ्य आहे असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रत्यक्ष खारीज नोंदवहीचे अवलोकन करुन जी माहिती त्यात उपलब्ध आहे त्या माहितीच्या छायांकीत प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. अशी प्रत ''माहितीच्या अधिकारात दिली'' अशा प्रकारे प्रमाणीत करुन देणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 29.4.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये शाळेमध्ये उपलब्ध असलेले खारीज नोंद वहीची तपासणी करुन त्या नोंदवहीमध्ये संबंधीत माहितीच्या संदर्भामध्ये जे दस्तऐवज उपलब्ध आहे त्या दस्तऐवजाची छायांकीत प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन घ्यावी. तसेच शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत ही जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी प्रमाणीत करुन द्यावी. त्याकरीता

अपीलकर्ता यांनी शाळेच्या कार्यालयीन वेळेत व तारखेस जन माहिती अधिकारी यांचेशी लेखी संपर्क साधून माहिती जशी आहे तशी विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सर्व रजिस्टर हे उपलब्ध करुन दयावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1058–1062

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 666/2008.**

सौ. ममता रमेशजी मानापूरे
स्टेशन टोली वार्ड नं. 1
पो. तुमसर रोड ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यपालन अधिकारी
जिल्हा परिषद भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.12.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी यांचेकडे एकुण 14 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती ही ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे खंड विकास अधिकारी यांनी सदरचा अर्ज हा सचिव ग्रामपंचायत यांचेकडे हस्तांतर करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून कळविलेले दिसून येते. व जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 20.12.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यावर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्याची सही केलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील मुदतीत नसल्यामुळे खारीज करण्यात आलेले दिसून येते. व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली व ती माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 3.12.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1063–1064

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 665/2008.**

श्री मारोती सुकदेव नगराळे

सलीमनगर दत्त मंदीर वार्ड

वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्य.)

जिल्हा परिषद चंद्रपूर

2) श्री श. म. कोचे

जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक

भारत विद्यालय चारगाव (खुर्द)

ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे एकुण 8 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही ती अपुर्ण असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 19.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे हमीपत्र दाखल केलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नव्हती व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती उपलब्ध झाली परंतु मुद्या क्र. 3 ते 8 ची माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध झालेली नाही. व मुद्या क्र. 3 च्या संदर्भामध्ये ठराव मागितलेला आहे व तो ठराव हा संस्थेच्या अधिकार कक्षेतील असल्यामुळे मुख्याध्यापक यांनी दि. 23.4.08 रोजी भारत शिक्षण संस्था वरोरा यांचे अध्यक्षांना पत्र दिलेले दिसून येते. त्याचप्रमाणे दि. 6.7.08 रोजी पुन्हा आपला अर्ज एक वर्षा पूर्वीचा असल्यामुळे सद्यास्थितीत माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व यावरुन अपीलकर्ता यांना माहिती मिळाली नाही व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी यांचेकडून मात्र हमीपत्र दिले आहे व शिक्षणाधिकारी यांनीसुध्दा कोणत्याही प्रकारे चौकशी न करता हमीपत्र सादर करुन घेतलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध असली तरी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 3 ते 8 ंच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 4.4.2008 च्या अर्जातील मुद्या क्र. 3 ते 8 ंची माहिती छायांकीत प्रतीच्या सवरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावे. अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1065–1067

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 663/2008.**

कु. पुष्पा पुजारामजी चांभारे
मु. पो. ता. गोंडपिपरी वार्ड नं. 2
जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री / श्रीमती /सौ.
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग नागपूर
2) श्री / श्रीमती /सौ.
जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य
दलितमित्र, वि.तु.नागपुरे अध्यापक विद्यालय
गोंडपिपरी ता. गोंडपिपरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**
वर्धा भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली

**( आदेश पारित दिनांक 11.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.3.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य दलितमित्र, वि.तु.नागपुरे अध्यापक विद्यालय यांचेकडे सन 1993 ते 96पर्यंत कालावधीत एकुण 7 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.
सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 25.3.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू प्रत्येक मुद्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनीच कागदपत्रे किंवा अभिलेखे गहाळ केलेली आहेत अशा प्रकारचे आरोप केलेले दिसून येतात व त्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे शिक्षण उपसंचालक यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दि. 15.5.2008 अन्वये सुचना देवून दि. 20.5.2008 रोजी सुनावणी आयोजित करण्याबाबत अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य तथा माहिती अधिकारी व अपीलकर्ता यांना पत्र दिले. त्यानंतर प्रत्येक वेळेस सुनावणी ठेवण्यात आली होती व दि. 7.7.2008 रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मुद्या क्र. 2 ते 5 ची माहिती उपलब्ध नाही तसेच मुद्या क्र. 6, 7 ची माहिती देता येईल असे दि. 19.7.2008 रोजी अपीलकर्ता यांना उपलब्ध माहिती तात्काळ द्यावी व जी माहिती उपलब्ध होत नाही त्याबाबत स्पष्ट कळवावे असे आदेश दिलेले दिसून येतात. त्यावर माहिती देण्याचे टाळाटाळ करतात असे साधे पत्र अपीलकर्ता यांनी शिक्षण उपसंचालक यांना दिलेले दिसून येते. दि. 22.2.2008 रोजी पुन्हा सुनावणी घेवून मुद्या क्र. 6 व 7 ची माहिती तात्काळ देण्याचे मान्य केले. व त्यामुळे प्रामि अपीलात दि. 5.11.2008 रोजी निर्णय दिलेला दिसून येतो.

3. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाचे असे निदर्शनास आणले की अपीलकर्ता हया सुमारे 10 वर्षापासून माहिती मागत आहे परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली जात नाही व माहिती उपलब्ध करुन देतांना त्यांनीच अभिलेखे गहाळ केलेली आहेत असे आरोप केलेले आहेत. वास्तविक अपीलकर्ता यांनी अभिलेखे गहाळ केले होते तर

संस्थेनी त्यांचे विरुध्द पोलीस कारवाई करणे आवश्यक होते परंतु ती तशी केलेली नाही व त्यामुळे सदरचे अभिलेखे किंवा कागदपत्रे ही संस्थेकडे किंवा शाळेकडे उपलब्ध असावयास पाहिजे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना उर्वरीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 8.3.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा क्र. 2,3,4,5 मधील माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे. तशी उपलब्ध करुन न दिल्यास संस्थेच्या विरुध्द शिक्षण उपसंचालक यांनी (मान्यता काढून घेण्याची) योग्य ती कारवाई करणे आवश्यक राहिल.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1068–1070

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 474/2008.**

श्री ज्ञानेश्वर बळीरामजी हिवसे (मु.लि.)
द्वारा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय
सिव्हील लाईन्स नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एम. हस्ते
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप संचालक
व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय
नागपूर
2) श्री एस. व्ही. राठोड
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक
व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.4.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.1.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

एक वर्षाचे 06–07 गोपनिय अभिलेख मध्ये प्रतिकुल शेरे नमुद असल्यामुळे पदोन्नती पासून पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात येत असल्याबाबतची शासन निर्णय प्रत / नियमप्रत.

2. विभागीय चौकशी सुरु असतांना पदोन्नती देता येत नाही या बाबतची शासन निर्णय प्रत / नियमप्रत मिळण्यात यावी.

3. पदोन्नती सर्वार्थाने अपात्र ठरविल्याबाबतचे प्रपत्राची फोटोप्रत.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.2.2008 व 14.3.2008 रोजी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता काही प्रशासकीय अडचणींमुळे 15 ते 20 दिवसाचा वेळ लागण्याची शक्यता आहे. संबंधित कार्यालसनाकडून माहिती उपलब्ध होताच आपणास विनाशुल्क पुरविण्यात येईल. मुद्या क. 2 मधील माहिती विभागीय चौकशी सुरु असतांना पदोन्नतीकीरता पात्र अपात्र ठरविण्याबाबत पदोन्नती समिती घेत असते त्याबाबतचा शासन निर्णय अभिलेख पडताळले असता आढळून न आल्याने पुरविता येत नाही. महा. शासनाचे शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून प्राप्त करुन घेता येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 29.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 22.4.2008 रोजी देण्यात आलेला दिसून येतो. व सुनावणी दरम्यान अपीलार्थीला वारंवार संधी देवूनही कोणत्याही प्रकारचे मुद्ये उपस्थित केले नाही परंतु जे अभिलेख विनेदन सादर केले त्यावर अपीलकर्त्यास कार्यालयातील अभिलेख्याचे निरीक्षण करावयाचे असल्यास तशी लेखी स्वरुपात मागणी

केल्यास मागणीचे निवेदन प्राप्त झाल्यानंतर निरीक्षणाची संधी उपलब्ध करुन दयावी. अपीलकाराने उपलब्ध अभिलेख तपासून मागणी केल्यास त्यापैकी अभिलेख प्राप्त करुन घेवू शकतील असा निर्णय देवून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दि. 8.5.2008 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांना एक पत्र दिलेले दिसून येते. त्या अभिलेख्याची तपासणीबद्यल आभार मानलेले आहे. परंतु कार्यालयातील कर्मचारी रेकॉर्ड असून देणार नाही व त्यामुळे कार्यालयाकडे चौकशी करुन 7 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दयावी असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतरच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये शासन निर्णय किंवा परिपत्रके व पदोन्नतीच्या संदर्भातील नियम यांची माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिल्यास अपीलकर्ता यांना माहिती मिळाली असे हाईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत पदोन्नतीच्या संदर्भातील शासन निर्णय वेळोवेळी दिलेले आदेश छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.4.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1071–1074

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 660/2008 व अपील क्रमांक 661/2008 .**

श्री रामजीलाल सत्यनारायण शर्मा
तंबाखू ओली कामठी 441002
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता (सां बां विभाग)
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी यांनी मुदत मिळावी असा अर्ज दिलेला आहे परंतु उत्तरवादी यांचा अर्ज हा फेटाळण्यात आलेला आहे. जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय

अधिकारी यांचे कार्यालयातून कागदपत्रे दाखल करण्यास पाठविणे आवश्यक होते. परंतु तेही कर्तव्य करण्यात आलेले नाही.

2. अपील क्र. 660/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 16.5.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडे दि. 15.4.2008 रोजी अतिक्रमण काढण्यासाठी दिलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दयावी. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 21.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचासुध्दा निर्णय झालेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे किंवा प्रथम अपीलाच्या अर्जाप्रमाणे त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही व निर्णयपण झालेला नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. व अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 661/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 21.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडे कामठी न.प.द्वारा शहर में अतिक्रमणधारीयों को जो नोटीस दी गई है उसकी जानकारी अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये दि. 15.7.2008 रोजी सायं. 5.00 वा. सुनावणी ठेवण्यात आली आहे असे पत्र दिसून येते. परंतु त्याबाबतचा निर्णय झाला नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. यावरुन अपीलकर्ता यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. व

अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 660/2008 अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 16.5.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टानी माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 16.5.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे त्यांचे विरुध्द रु. 25000/– शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा शास्ती कायम होईल.

3) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 661/2008 अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 21.5.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टानी माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

4) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 21.5.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे त्यांचे विरुध्द रु. 25000/– शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा शास्ती कायम होईल.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1076–1079

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 479/2009, 482/2008, 483/2008, 484/2008 व 485/2008.**

सौ. वर्षा विलास पप्पुलवार
पदमालयानगर, एकार्जूना प्लॉट क्र. जे 35
पो. एकर्जुना
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. पी. देवकाने
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (बांध)
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. (स व सु विभाग)
वरोरा ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) श्री पी. डी. मोटघरे
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (फा) (बांध)
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. (स व सु विभाग)
वरोरा ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.4.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. 20.2.2008, 2.5.2008 रोजी 2, व 20.2.2008 रोजी 2 असे एकुण पाच द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दाखल केलेली आहेत. सदरच्या पाचही

द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपील क्र. 479/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 20.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी बा. कृ. सं व सु विभाग वरोरा यांचेकडे एकुण 4 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती एकाच तारखेचे व एकाच लोडचे शेतीपंपाच्या डिमांड मध्ये फरक कां.

माहिती टपालाने हवी असे नमूद केलेले आहे. माहिती ही उपकार्यकारी अभियंता यांचे कार्यालयातील असल्यामुळे सदरचा अर्ज दि. 26.2.2008 रोजी सहाय्यक अभियंता यांनी उपकार्यकारी अभियंता यांचेकडे हस्तांतर केलेला दिसून येतो. व सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 24.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे अपीलाचे सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 13.3.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. व त्या पत्राची प्रतसुध्दा सादर केलेली आहे. व त्यामुळेच प्रथम अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. वास्तविक अपीलकर्ता यांना माहिती जर उपलब्ध झालेली आहे तर त्यांनी त्यांचे प्रथम अपीलात किंवा द्वितीय अपीलात तसे नमुद केलेले नाही. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी कार्यकारी अभियंता यांनी दि. 4.4.2008 च्या पत्राप्रमाणे माहिती सुध्दा अपीलकर्ता यांना दि. 13.3.2008 च्या अनुषंगाने पुन्हा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. वास्वविक स्पष्टपणे त्याबाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी अपीलकर्ता यांनी पुन्हा तेच तेच प्रश्न उपस्थित करुन प्रथम अपीलात किंवा द्वितीय अपीलात माहिती उपलब्ध झालेली नाही अशाप्रकारे नमुद केलेले दिसून येते. व सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 482/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. तात्पूरते विज कनेक्शन बाबत प्रचलित नियमाबाबत माहिती दयावी 2. एखाद्या लेआउट मधून एचटी विद्युत लाईन जात असल्यास तिला हटविणे कंपनीच्या नियमाप्रमाणे आवश्यक आहे का 3. सुर्ला येथील रहीवासी शाळेत मागील दोन वर्षापीर्वी दिलेले तात्पूरते व नंतर त्यालाच केलेला कायमस्वरुप विज पुरवठा संबंधी सर्व कागदपत्रांची झेरॉक्स प्रती पाहिजे आहे. 4. घरगुती बांधकाम ग्राहकांनी कायमस्वरुपाची मागणी केली असताही त्यांना तात्पूरतेचा विज पूरवठा घेणे कंपनीच्या नियमानुसार कोणते नियमानुसार घेणे अगर बंधनकारक असल्यास त्याची झेरॉक्स प्रत व माहिती दयावी.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता माहिती अधिकारी स व सु उपविभाग वरोरा यांचेकडे माहिती सादर करण्याकरीता अग्रेषित केले. स्मरणपत्रसुध्दा दिलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 21.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये दि. 18.7.2008 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे सुनावणी घेण्यात आली. त्यात माहिती अधिकारी अपीलीय अधिकारी व अर्जदार यांचे या विषयावर चर्चा झाली. व अर्जदाराचे सर्वतोपरी समाधान झाल्याचे अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी यांची खात्री झाली त्यानंतर सुनावणी पूर्ण झाल्याचे जाहीर केले व मुद्या संपला. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली होती त्याबद्यल अवगत करण्यात आले असता त्यांनी असे सांगितले की नियमाप्रमाणे आहे किंवा नाही याची

खात्री नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना नियमाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

6. अपील क्र. 483/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी उपविभाग वरोरा महावितरण कं. यांचेकडे पाटाळा येथील 15 टक्के डी आर सी मध्ये झालेले 02 शेती पंपाचे वर्ष जाने. फेब्रु. 2007 कामासंबंधी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती टपालाने हवी असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 14.3.2008 रोजी आपण माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये काही माहिती मागितलेली आहे. आपला दोन्ही अर्ज बधितल्यावर अर्जाच्या अनुषंगाने शंका निर्माण झाली आहे. आपण स्वतः अर्ज माहिती अधिका–याला न दिल्यामुळे त्या शंका तुम्हाला विचारणे शक्य झाले नाही. तेव्हा आपणास विनंती करण्यात येते की आपण स्वतः हे पत्र मिळाल्यापासून तीन दिवसाचे आत माहिती अधिका–याला भेटावे व शंकाचे समाधान करावे. व आम्हाला मतद करावी. शंकाचे समाधान झाल्यावर आपणाला हवी असलेली माहिती त्वरीत देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दि. 24.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दयावी असे आदेश झालेले दिसून येत आहे. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

7. जन माहिती अधिकारी श्री वि.प.सावनेरकर यांनी माहिती न दिल्याची कारणे खालीलप्रमाणे दिली आहे. 1. श्रीमती वर्षा विकास पप्पुलवार यांचे दोन अर्ज दिनांक 20. 2.2008 ला प्राप्त झाला. परंतु या दोन अर्जावरती वेगवेगळया स्वाक्ष–या असल्यामुळे हया दोन्ही सहया श्रीमती वर्षा विकास पप्पुलवार यांच्याच आहेत काय म्हणून शंका निर्माण झाल्यावर शंकेचे निवारण करण्याकरीता श्रीमती वर्षा विकास पप्पुलवार यांना पत्र

देवून कार्यालयास येण्यास सांगितले परंतु त्या हजर न झाल्यामुळे माहिती देण्यात आली नाही. अर्ज हे श्री विलास पप्पुलवार निलंबीत कनिष्ठ अभियंता यांनी आणून दिला होता व त्याप्रमाणे त्यांना पत्र पण दिले होते. व त्यामुळेच त्यांना माहिती देण्यात आली नाही. तसेच दि. 18.7.2008 ला अपीलीय अधिकारी यांच कक्षात अर्जदाराला स्वाक्षरीच्या फरकाबाबत विचारले असता त्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्यामुळे त्यांना माहिती देण्यात आली नाही. अर्जदाराने वेगवेगळया स्वाक्ष–याबाबत समाधानकारक स्पष्टीकरण दिल्यास त्यांना हवी असलेली माहिती ताबडतोब देण्यात येईल असे स्पष्टीकरण दिलेले दिसून येते. व यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

8. अपील क्र. 484/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 20.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी स व सु उपविभाग वरोरा यांचेकडे मागील दोन वर्षातील सन 2005–06 व 2006–2007 विज चोरीबाबत माहीतीसंबंधी माहिती मागितलेली दिसून येते. श्रीमती वर्षा विकास पप्पुलवार यांचे दोन अर्ज दिनांक 20.2.2008 ला प्राप्त झाला. परंतु या दोन अर्जावरती वेगवेगळया स्वाक्ष–या असल्यामुळे हया दोन्ही सहया श्रीमती वर्षा विलास पप्पुलवार यांच्याच आहेत काय म्हणून शंका निर्माण झाल्यावर शंकेचे निवारण करण्याकरीता श्रीमती वर्षा विकास पप्पुलवार यांना पत्र देवून कार्यालयास येण्यास सांगितले परंतु त्या हजर न झाल्यामुळे माहिती देण्यात आली नाही. अर्ज हे श्री विकास पप्पुलवार कनिष्ठ अभियंता यांनी आणून दिला होता व त्याप्रमाणे त्यांना पत्र पण दिले होते. व त्यामुळेच त्यांना माहिती देण्यात आली नाही. तसेच दि. 18.7.2008 ला अपीलीय अधिकारी यांच कक्षात अर्जदाराला स्वाक्षरीच्या फरकाबाबत विचारले असता त्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्यामुळे त्यांना माहिती देण्यात आली नाही. अर्जदाराने वेगवेगळया स्वाक्ष–याबाबत समाधानकारक स्पष्टीकरण दिल्यास त्यांना हवी असलेली माहिती ताबडतोब देण्यात येईल असे स्पष्टीकरण दिलेले दिसून येते. व यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

9. अपील क्र. 485/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी स व सु उपविभाग वरोरा यांचेकडे छाबडा लेआउट तसेच इतर लेआउट उपविभाग वरोरा अंतर्गत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने हवी असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.4.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 31.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व अर्जादाराचे समाधान झाल्याचे लक्षात आल्यामुळे मुद्या संपला असे अपीलीय अधिकारी यांनी खुलासा सादर केला आहे. असे असले तरी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

10. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

11. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांचे पती श्री वि. ल. पप्पलवार हे निलंबीत कनिष्ठ अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. आहे असे दिसून येते व त्यामुळेच ते अशा प्रकारची माहिती मागत असून अधिका–यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसते. वास्तविक एखाद्या निलंबीत कर्मचा–याने त्याच कार्यालयात अनेक अर्जाच्या माध्यमातून वेगवेगळी जर माहिती मागण्यास सुरुवात केली तर याचा अर्थ हा त्याच कार्यालयातील कर्मचा–याना त्रास देण्याकरीता माहिती मागत आहे असे दिसून येते. वास्तविक वि. ल. पप्पलवार हे कनिष्ठ अभियंता त्याच कंपनीत होते त्यामुळे त्यांना सर्व नियमांची माहिती असणे अपरीहार्य आहे व असे असून सुध्दा ते माहिती मागत आहे. यावरुन ते त्या कार्यालयातील कर्मचा–याना किंवा अधिका–यांना त्रास देण्याच्या उद्येशाने माहिती मागत आहे असा निष्कर्ष काढता येतो. ही बाब प्रकर्षाने सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास

आणली नव्हती. परंतु निर्णय देतांना सर्व कागदपत्राचे अवलोकन केले असता त्या मधून श्री वि. ल. पप्पलवार हे निलंबीत कनिष्ठ अभियंता आहे हे दिसून आल्यामुळे यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित दिसून येत नसल्यामुळे वरील सर्व अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत. त्यामुळे हया अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

**आ दे श**

1) अपील क्रमांक 479/2009, 482/2008, 483/2008, 484/2008 व 485/2008 ही खारीज करण्यात येतात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.4.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1080–1086

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 664/2008.**

श्री नरेश गंगारामजी नवखरे
मु. पो. पिंपळगाव/सडक
ता. लाखनी जि. भंडारा 441804 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. तसेच अपीलकर्ता यांनी दि. 22.4.2009 नुसार अर्जदारास न्याय

मिळाल्यामुळे नस्तीबध्द करण्याची विनंती केलेली आहे **असे कक्ष अधिकारी राज्य माहिती आयोग यांनी नोट शिटवर लिहिलेल्यामुळे** सदरचे अपील खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 7.5.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1087–1088

क्र. रामाआ/नाग/        /2009
कार्यालय राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
दिनांक 15 मे 2009

प्रति,

मुख्य राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोगा, 13 वा मजला,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालया समोर,
मादाम कामा रोड,
मुंबई – 400032.

विषय :– राज्य माहिती आयोग बुहन्मुंबई यांनी नागपूर येथील अपीलकाराच्या अपीलाची सुनावणी घेणेबाबत.

संदर्भ :– श्री गो. मा. झाडे यांनी दि. 12.5.2009 रोजी माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग नागपूर यांचे कार्यालयात सादर केलेले पत्र.

सदरच्या पत्रावरुन असे दिसून येते की विदर्भ क्षेत्रातील अर्जदार यांनी दाखल केलेल्या परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी बुहन्मुंबईत असलेल्या सार्वजनिक प्राधिकरणातील मागितलेल्या माहितीच्या संदर्भात द्वितीय अपीलाची सुनावणी फक्त बुहन्मुंबई करीता नियुक्त झालेले माहिती आयुक्त हे सुनावणी घेणार आहेत असा आक्षेप घेणारे मुख्य माहिती आयुक्तांना पाठविलेल्या पत्राची प्रत या कार्यालयात दाखल करुन या कार्यालयानी त्यांची द्वितीय अपीले माहिती आयुक्त बुहन्मुंबई यांचे कार्यालयात पाठविली आहेत काय असेही अवगत करावे अशी विचारणा केलेली आहे.

2. राज्य मुख्य माहिती आयुक्तांना संपूर्ण राज्यातील कोणत्याही अर्जदाराने दाखल केलेली अपीलाची सुनावणी व निर्णय देण्याचा अधिकार आहे. व त्या कारणास्तव विदर्भ क्षेत्रातील अपीलकाराची अपीले परंतु सार्वजनिक प्राधिकरण बुहन्मुंबई आहे. अशी अपीले राज्य मुख्य माहिती आयुक्तांच्या सुचनेप्रमाणे त्यांना निर्णय देण्यासाठी पाठविण्यात आली होती. परंतु राज्य मुख्य माहिती आयुक्त हे सुनावणी न घेता राज्य माहिती आयुक्त बुहन्मुंबई हे सुनावणी घेणार असे या पत्रावरुन दिसून येते.

3. माझी नियुक्ती झाल्यापासून गेल्या सव्वा दोन वर्षामध्ये आयोगाचे कामकाज हे कायदेशीरपणे कसे चालावे याकरीता अनेक सुचना केल्या, पत्रे दिली परंतु मुख्य माहिती आयुक्तांनी त्यास वाटाण्याच्या अक्षता लावल्या.

4. राज्य माहिती आयुक्ताची एकदा नियुक्ती झाल्यानंतर दुस–या महसुल विभागामध्ये त्यांची बदली होवू शकत नाही असे महाराष्ट्राचे महाअधिवक्ता यांनी लेखी अभिमत सामान्य प्रशासन विभागास दिलेले आहे व सदरचे अभिमत हे राज्य मुख्य माहिती आयुक्त यांना पुर्णपणे अवगत आहे. यावरुन एका माहिती आयुक्त यांच्या अधिकार क्षेत्रातील अपीलाचे निर्णय दुस–या क्षेत्रातील माहिती आयुक्त हे मा. राज्यपालांच्या आदेशाशिवाय देवू शकत नाही हे स्पष्ट होते. ही बाब सुध्दा राज्य मुख्य माहिती आयुक्तांच्या अनेकदा निदर्शनास आणलेली आहे. परंतु असे असूनसुध्दा राज्य माहिती आयुक्त बुहन्मुंबई हे विदर्भ क्षेत्रातील अर्जदार अपीलकाराच्या अपीलाची सुनावणी घेणार आहे हे एक षडयंत्र दिसून येते. त्याकरीता आयोगाच्या बैठकीतसुध्दा कोणत्याही प्रकारचे चर्चा किंवा निर्णय झालेला नाही. वास्तविक असे निर्णय आयोगाच्या बैठकीत व्हावयास पाहिजे. परंतु षडयंत्र करावयाचे विषय हे आयोगाचे बैठकीत चर्चीले जात नाही व निरर्थक कोणत्याही प्रकारचे नियम न करता अपीलाच्या निकाली काढण्याची चर्चा मात्र तासनतास सुरु असते व त्यातच बैठक संपते.

5. त्यातच बैठकीमध्ये राज्य माहिती आयुक्त बुहन्मुंबई हे राज्य मुख्य माहिती आयुक्तापेक्षा राज्य माहिती आयोगाचे कामकाज चालविण्याची जबाबदारी त्यांची आहे अशा थाटात इतर राज्य माहिती आयुक्तांना आश्वासन देत असतात. एकुणच आयोगाचे कामकाज हे संपूर्ण अनियमिततेवरच आधारीत सुरु आहे असे वारंवार निदर्शनास आणूनसुध्दा मनमानी कारभार थांबत नाही.

6. दिनांक 4 मे 2009 रोजी महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या दि. 24 एप्रिल 2009 रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त नुकतेच प्राप्त झाले आहे. त्या इतिवृत्तामध्ये मुद्या नं. 4 मध्ये पुन्हा मागिल बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणेच निर्णय घेतलेले आहे. परंतु त्या बाबतच्या

अंमलबजावणीकरीता राज्य माहिती आयोगास आदेश काढावा लागेल या माझ्या सुचनेचा कोणताही उल्लेख दिसून येत नाही. व तसा आदेश काढलेला आहे असेही दिसून येत नाही. यावरुन एकतर कायदेशीर तरतुद किंवा प्रशासकीय तरतुदीची जाणीव राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दिसत नाही. मुद्या क्र. 5 हा राज्य माहिती आयोगाचे बैठकीत चर्चीला गेला नाही तरीसुध्दा त्याबाबतचा निर्णय त्यात दाखविण्यात आलेला आहे. मुद्या क्र. 6 च्या संदर्भात सुध्दा सर्व आयुक्तांचे एकमत झालेले नाही असे आयोगाचे बैठकीत दिसत होते परंतु त्यातही निर्णय झालेला आहे असे चित्र उभे केलेले आहे. मुद्या क्र. 9 मध्ये मुख्य आयुक्तांनी असे प्रतिवादन केले की इनोवेटिव्ह पध्दती, आटोपशीर निर्णय, कॉलेज विद्यार्थ्यांची मदत वगैरे माध्यमातून आणखी निर्गत वाढविण्याचा त्यांनी प्रयत्न करावा असे नमुद केलेले आहे. परंतु या सुचनाची आयोगाचे बैठकीत कोणत्याही प्रकारे चर्चा झालेली नाही व त्याबाबतची दखलही घेण्यात आलेली नव्हती. त्याबाबत सुध्दा मी असे सांगितले होते की ज्या पध्दतीनी मी अपीले निकाली काढतो त्याच पध्दतीने मी निकाली काढणार. त्यामुळे अपीले निकाली काढण्याच्या संदर्भातील निरर्थक चर्चा करु नये कारण काही माहिती आयुक्त ज्या पध्दतीनी अपीले निर्गीत करतात ती पध्दत मला मान्य नाही. तसेच कॉलेज विद्यार्थ्याची मदत वगैरे घेवून अपीले निर्गीत करावी ही सुध्दा पध्दत मला मान्य नाही. राज्य माहिती आयुक्तांना अपीले निर्गत करण्याचा जो अधिकार दिलेला आहे तो अधिकार अर्ध–न्यायीक पध्दतीने वापरावयाचा आहे व त्यामुळे दुस–या कुणीतरी घेतलेल्या निर्णयावर सहया करणे मला मान्य नाही. पुढील बैठकीत याबद्यलचे आक्षेप मी नोंदविणारच आहे परंतु अशा प्रकारचे आक्षेप नोंदवून सुध्दा घेतले जात नाही व त्याकरीतासुध्दा बैठकीत हजर राहणेसुध्दा निरर्थकच आहे व त्याकरीता हा पत्रप्रपंच.

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 685/2008.**

श्री विलास वामनराव लोहोटे
बी 3/12 बजरंग कॉम्प्लेक्स
सिरसपेठ नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी
नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार नागपूर (शहर) ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.4.2008 रोजी एकुण 6 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 7.7.2008 रोजी अर्जातील मागितलेली माहिती कलम 2 (च) चे व्याख्येत बसत नसल्यामुळे आपला अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे असे कळविलेले दिसून येते. तत्पूर्वी अपीलकर्ता यांनी दि.

9.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. दि. 5.7.2008 रोजी उपविभागीय अधिकारी नागपूर यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जी नियमावली असेल त्या नियमावलीची छायांकीत प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या च्या अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली नियमावलीची छायांकीत प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन दयावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1092–1093

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 683/2008.**

श्री विकास गणपतराव शेंडे
नागरी बॅंक कॉलनी, राष्ट्रभाषा प्रचार समितीचे मागे
हिंदनगर वर्धा ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री कु. ल. कडू
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
2) श्री अे. के. गौर
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.4.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे नगरविकास नियमावली नागपूर सुधार प्रन्यासचे पत्रे नागपूर महानगरपालिकेला व म्हाडाला 1991 पासून आजपर्यंत. व सोबत जोडलेल्या त्याच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती रजिष्टर पोष्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 13.5.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 21.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 25.6.2008 रोजी पुन्हा मुद्येनिहाय त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व यावरुन अपीलकर्ता यांना वास्तविक सर्व माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता हे अनेक अर्जाच्या माध्यमातून विश्लेषणात्मक प्रश्नार्थक माहिती ते मागत असतात. व त्यांना वेळोवेळी सर्व प्राधिकरणांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हे आयोगाचे सुध्दा निदर्शनास आणलेले आहे. आयोगातच अपीलकर्ता यांचे अनेक अपीलाचे निर्णय झालेले आहेत व अनेक अपीले प्रलंबीत आहे व माहितीचा विषय एकच आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असल्यामुळे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1094–1096

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 682/2008.**

श्री रामराव देवराव रा>त
रा. पो. काकडा
ता. कारंजा घा. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अर्जुन सोपान तांदळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा अधिक्षक ( कृषी )
कार्यालय वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक कृषी अधिकारी
वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. कार नदीच्या पाझर कालव्यामुळे पिकाचे हाणीकारक क्षेत्राच्या माहितीची यादी ज्यात पिके गेल्यामुळे नुकसान भरपाई करीता पात्र ठरविण्यात आलेल्या लाभार्थ्याची यादी त्या यादीत मौजा काकडा येथील कोण कोणत्या पावासह लाभार्थी भरपाईस पात्र ठरविल्या गेले त्यांच्या शेताच्या सं.नं. सह व नावासह यादी प्राप्त होणे गरजेचे आहे. ती देण्यात यावी.

2. ज्यांचे पिकास कालव्यापासून हाणी पोहचली नसेल अशी आपले मत जरी ठरले असले तरीही मात्र ज्यांचा हाणीनुसार अज्र आपणाकडे मा. जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडून उपरोक्त विषयांकित सर्व अर्जाची प्रत जिल्हाधिकारी वर्धा यांनी दाखल घेवूनच ज्यांचे पत्र क्र. अका/जिमंअ/कावि/549/08 दि. 13.3.08 च्या पत्रान्वये मला अर्जदारास आपण सर्व खुलासेवार माहिती देण्यास जिल्हाधिकारी वर्धा यांनी आपणास कळविले आहे. तीच माहिती अर्जदारास अपेक्षीत असल्यामुळे व ती माहिती आपल्या कायाककलयाने अर्जदारास अद्यापही न दिल्यामुळे नाईलाजाने माहितीचा अधिकार कायद्यान्वये माहिती मिळण्यासाठी हा अर्ज दाखल करावा लागला आहे.

सदरची माहिती टपाला द्वारे पाठवावी असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 7.7.2008 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.5.2008 रोजी तालुका कृषी अधिकारी कारंजा येथे जन माहिती अधिकारी श्री घोगेवाड यांचेकडे अर्ज पाठविण्यात आला. परंतु अपीलकर्ता यांना अवगत केले नाही तसेच प्रथम अपील सुध्दा श्री एस. आर. नागुलवार यांनी सुनावणीस ठेवली नाही व त्यामुळे अपीलाची सुनावणी झाली आहे आयोगास दाखल केला आहे. तसेच जन माहिती अधिकारी (प्रशासन) श्री घोगेवाड यांनी सुध्दा सहा. जन माहिती अधिकारी (प्रशासन) पी. एच. पाटील यांनी संबंधित अर्जदारास

विहित मुदतीत माहिती देण्यासाठी कोणताही प्रयत्न केला नाही असा खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेला आहे. परंतु माहिती उपलब्ध आहे असाही खुलासा दाखल केलेला आहे. जिल्हा कृषी अधिकारी यांनी श्री पी.एच.पाटील व नागुलवार यांच्या संदर्भामध्ये दाखल केलेल्या खुलाशावरुन असे दिसून येते की तत्कालीन जन माहिती अधिकारी (प्रशासन) श्री घोगेवाड, श्री पी.एच. पाटील व नागुलवार हे जबाबदार आहे असे दिसून येते. श्री पी.एच.पाटील हे आयोगापुढे हजर झाले होते व त्यांनी माहिती का उपलब्ध करुन दिली नाही असे विचारले असता कोणत्याही प्रकारचे उत्तर दिले नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी व पी.एच.पाटील यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 14.5.2008 अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन न देण्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. जन माहिती अधिकारी हे जबाबदार आहेत असे आढळुन येत असल्यामुळे व त्यांचे म्हणणे एकुन घेण्यास संधी त्यांना देण्यात आलेली असल्यामुळे यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 25000/– ची शास्ती लादण्यात येत आहे.

3) सदरच्या शास्तीची वसुली जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी. वरील प्रमाणे शास्तीची रक्कम ही जबाबदारी निश्चित करुन प्रमाणात ठेवण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1097–1100

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 153/2008.**

श्री संजय व मोरे
रा. पाल पेट्रोल पंप
न्यु पांजरा कोराडी नागपूर ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता
नागपूर मध्यम प्रकल्प विभाग नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 12.5.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 15.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 19.9.2008 रोजी श्री वेमुलकोंडा का. अ. शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे संपत्तीचे विवरण पत्र अ,ब,क,ड ची प्रमाणित प्रत देण्यात यावे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 13.10.2008 रोजी आपण मागितलेल्या विषयांकीत माहितीचे विवरणपत्र या कार्यालयात

ठेवण्यात येत नसून अधिक्षक अभियंता नागपूर पाटबंधारे मंडळ यांचे कार्यालयात ठेवण्यात येतात. करीता आपण त्या कार्यालयातून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. कार्यकारी अभियंता मध्यम प्रकल्प विभाग यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

संबंधित अर्जदाराने कार्यालय प्रमुख कार्यकारी अभियंता श्री वेमुलकोंडा यांची भत्ता व दायित्वाचे विवरणपत्र अ,ब,क,ड ची प्रमाणित प्रत मागितली होती परंतु श्री वेमुलकोंडा हे वर्ग 1 राजपत्रित अधिकारी असल्याने त्यांनी वैयक्तिक भत्ता व दायित्वाचे विवरणपत्र बंद लिफाफयात कनिष्ठ कार्यालयाकडे ( अधिक्षक अभियंता नागपूर पाटबंधारे मंडळ ) यांचेकडे सादर केले आहे. हे कार्यालय कनिष्ठ असल्याने वरिष्ठ कार्यालयास संबंधित अर्जदाराचा अर्ज हस्तांतरीत करणे योग्य नव्हते. करीता त्यांचा अर्ज परत करुन मंडळ कार्यालयास अर्ज करुन विवरणपत्र प्राप्त करुन घ्यावे असे सुचित करण्यात आले. माहिती अधिकारांतर्गत मागितलेल्या माहिती अर्जाच्या प्राप्त दिनांकापासून 30 दिवसापर्यंत देण्याची विहीत मुदत आहे. तसेच अर्जदार हे माहिती व्यक्तीशः घेवून जाणार असल्याने 30 दिवसाच्या मुदतीच्या आंतच माहिती दि. 13.10.2008 रोजी तयार करुन ठेवण्यात आली होती. अर्जदाराने दि. 22.10.08 ोजी माहिती घेवून गेलेत व संबंधितास योग्य ती माहिती देण्यात आली आहे. या कार्यालयाच्या जावक पत्रावर दि. 13.10.2008 नमूद आहे. ज्या स्वाक्षरीखाली दि. 15.10.2008 नमूद आहे. ती स्वाक्षरी अधिका–याची नसून प्रथम लिपिक यांची आहे. अधिका–याची स्वाक्षरी झाल्यानंतर प्रथम लिपीक यांनी दि. 15.10.2008 ला पत्राची पाहणी केल्यामुळे चुकीने दि. 13.10.2008 ऐवजी दि. 15.10.2008 नमूद केलेला आहे.

यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 12.5.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1101–1103

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 711/2008.**

श्री अशोक गुलाबराव बोंदरे
मु. पो. ता. मौदा (शिवनगर) वार्ड क्र.5
ता. मौदा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री के. पी. भगत
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता ( नागपूर ग्रामीण )
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. नागपूर
विद्युत भवन काटोल रोड नागपूर
2) श्री जी. जी. जयस्वाल
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. मौदा
ता. मौदा जि. नागपू ..... **उत्तरवादी**
वर्धा भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली

**( आदेश पारित दिनांक 16.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.3.2008 रोजी माहिती अधिकारी सहाय्यक अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी कार्यालय मौदा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. घरगुती शिलाई मशीन म्हणन व्यवसाय होत नाही. आपण डी.एल.वर सी.एल.ची रिकवरी का काढण्यात आली.

2. ग्राहकाला माहिती न देता 2001 ते 2003 ची रिकवरी करुन जानेवारी 2006 मध्ये का समाविष्ट करण्यात आली.

3. विज वितरण कंपनीचे असे कोणतेही जी आर आपल्याकडे नाही तरी पण आण याची चौकशी न करता माझ्या बिलामध्ये समायोजन बिल का लावण्यात आले.

4. नागपूर मुख्यालयातून आले अधिका–याचे पत्ता मिळण्यात यावा व खालील अधिका–याचे पत्ते

1. श्री मोरेश्वर शिर्से ए.ई.

2. श्री झाडे बाबू मौदा विभाग

3. श्री माडवे साहेब जे.ई

4. श्री राजेंद्र पारेभरे बिल वितरण विभाग

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.4.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 3.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 7.8.2008 रोजी अपीलकर्ता यांना पुन्हा माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दि. 18.8.2008 रोजी उपलब्ध झालेले दिसून येते. व तरीही

अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. परंतु द्वितीय अपीलामध्ये माहिती चुकीची दिल्याबाबत परिपत्रक जोडले असे अपीलकर्ता यांनी नमूद केलेले आहे. परंतु त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा दिलेला नाही व परिपत्रकही जोडलेले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1104–1106

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 712/2008.**

श्री सुभाष तुकारामजी तांबेकर
मु. पो. सिरसगाव (बाजार)
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एल. एम. बोरीकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता (स व सु विभाग)
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. वर्धा
विद्युत भवन बोरगाव नाका वर्धा
2) श्री एस. डी. राठोड
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (स व सु विभाग)
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी कार्यालयाचा तपशिल दिलेला नाही. परंतु कृषी पंपाचा अतिरिक्त डिमांड बाबत एकुण दोन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 31.3.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 3.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात पुन्हा दि. 22.5.2008 रोजी माहिती अधिकारी यांनीच उत्तर दिलेले दिसून येते. सदरची माहिती चुकीची आहे याकरीता पुन्हा अपीलकर्ता यांनी दि. 24.9.2008 रोजी कार्यकारी अभियंता हिंगणघाट यांचेकडे अर्ज केलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की माहिती अंतर्गत दि. 16.8.2005 ला डिमांड दिली हे सत्य नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे असे निदर्शनास आणले की अपीलकर्ता यांना दि. 21.7.2008 रोजी दिलेल्या पत्राची प्रत दाखविण्यात आली परंतु मुद्या क्र. 13 मध्ये कार्यालयात उपलब्ध असलेल्या दस्तऐवजाप्रमाणे दि. 16.8.2005 रोजी आपणास अतिरीक्त डिमांड देण्यात आलेली आहे असे नमूद केलेले दिसून येते. कनिष्ठ अभियंता यांचे पत्रानुसार दि. 16.8.2005 नुसार विज पुरवठा घेतला नाही असे नमूद केलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना दि. 16.8.2005 रोजी थ्री फेज मीटरची अतिरिक्त मागणी करणारे मागणी पत्र देण्यात आले. सदरच्या मागणी पत्राची प्रत आयोगाचे निदर्शनास आणण्यात आली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना चुकीची माहिती दिली हे त्यांचे म्हणणे खरे आहे असे दिसून येते. व त्याकरीता जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना चुकीची माहिती उपलब्ध दिली या कारणास्तव तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा त्यांचे विरुध्द रु. 5000/– ची शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1108–1110

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 726/2008.**

श्री देवाभा> भगवान उराडे
मु. विद्याविहार कॉलनी सिंदेवाही
ता. सिंदेवाही जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
विभागीय आयुक्त कार्यालय
नागपूर विभाग नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी (प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 22.1.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (प्रशासन) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. नागपुर विभागीय कर्मचा–यांची सेवा जेष्ठता यादि (विस्तार अधिकारी) (पंचायत) (सांख्यिकी) (एम जी एस वाय) आणि (कृषि अधिकारी) या संवर्गाची 2007 ची.

2. नागपुर विभागात गट विकास अधिकारी व बाल विकास अधिकारी यांचा अनुशेषाची माहिती 2007 पर्यंतची

3. नागपुर विभागीय गट विकास अधिकारी व बाल विकास अधिकारी यांच्या रिक्त असलेल्या जागाची माहिती

4. नागपुर विभागात गट विकास अधिकारी व बाल विकास अधिकारी यांचा मागासवर्गीय अनुशेषाची माहिती

5. गट विकास अधिकारी व बाल विकास अधिकारी या पदावर सन जानेवारी 2000 ते डिसेंबर 2007पर्यंत पदोन्नती दिलेल्या उमेदवाराची नावे, जिल्हा, जातीचा संवर्ग, पदोन्नतीची तारीख

6. उध्दव साबळे विस्तार अधिकारी पं. जिल्हा चंद्रपुर यांची पदोन्नती रोखण्यात आली त्या अनुषंगाने टिपणीची झेरॉक्स प्रती

7. गट विकास अधिकारी व बाल विकास अधिकारी यांची सेवा जेष्ठता यादी 2007 पर्यंत ची झेरॉक्स प्रती

8. गट विकास अधिकारी व बाल विकास अधिकारी या पदावर पदोन्नतीने रिक्त जागा भरणा करण्यासंबंधाने शासनाकडुन आपले कार्यालयात जानेवारी 2007पर्यंत प्राप्त झालेले शासन निर्णयाची प्रती

9. ग.वि.अ. पदाचा अतीरीक्त कार्यप्रभार देण्याबाबत शासनाकडून 2000–2007पर्यंत प्राप्त झालेल्या पत्राचे झेरॉक्स प्रती.

सदरच्या माहितीचा कालावधी 2000–2007 असा आहे. माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.2.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेली माहिती अपुर्ण आहे या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दि. 3.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याबद्यल त्यांनी मुद्या क्र. 1,5,6,7,8 व 9 ची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नसल्याचे कारण दिलेले आहे. त्यावर खुलासा करतांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असा खुलासा केलेला आहे की अपीलकर्ता यांनी दि.30.4.2008 व 16.5.2008 रोजी प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्यास कळविले होते. परंतु अपीलकर्ता दोन्ही तारखेस उपस्थित झाले नाही व त्यामुळे त्यांना माहितीत स्वारस्य नाही असा निष्कर्ष काढलेला दिसतो. तसेच अपीलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

श्री डि.बी.उराडे व अरुण माद्येश्वार हे दोघे मित्र असून श्री माद्येश्वार हे भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे सचिव आहे. श्री माद्येश्वार हे बी.पी.एल.चे प्रमाणपत्र सादर करुन वारंवार मविसे वर्ग 1 व 2 चे अधिका–यांच्या बाबतीत सेवाविषयक माहिती जसे विभागीय चौकशी, निवड सूची, जेष्ठता सुची तक्रारी शासन आदेश परिपत्रक त्रयस्थ व्यक्तीची माहिती मागतात. तसेच श्री उराडे यांना माहितीच्या अधिकारात पैसे भरण्यास कळवून देखि लते पैसे सुध्दा भरुन माहिती नेत नाही. त्यामुळे माहितीचा शोध घेण्यास कार्यालयीन वेळोचा मोठया प्रमाणात अपव्यय होत आहे.

श्री माद्येश्वार यांनी बी.पी.एल.चा दाखला जोडून माहितीच्या अधिकारात या कार्यालयात आतापर्यंत मागीत एक वर्षात 17 अर्ज दिलेले आहे. तसेच श्री उराडे यांनी

6 अर्ज केले आहेत. श्री उराडे व श्री माद्येश्वार यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप अधिका–यांचे सेवाविषयक बाबीसंबंधी आहे. श्री माद्येश्वार यांचे लेटरपॅडवर स्वाक्षरी घेवून ग्राम सेवकाच्या वरीष्ठ अधिका–याकडे तक्रारी करतात व माहितीच्या अधिकारात माहिती मागतात असे निष्कर्ष सहा. आयुक्त चौकशी विभागीय आयुक्तांचे कार्यालय नागपूर यांनी श्री उराडे यांचे विभागीय चौकशी प्रकरणात काढला आहे.

यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यात कोणतेही स्वारस्य दिसून येत नाही. आजही अपीलकर्ता हजर नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1120–1123

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 722/2008.**

श्रीमती अकीला बेगम ज. मोहम्मद शफी खान
फुलचूर पेठ विजय किराण स्टोअर्सजवळ
आय टी आय समोर
ता. गोंदिया जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ल. ग. चौधरी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख गोंदिया यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. मौजा गोंदिया मालविय वार्ड येथील अर्जदाराचे प्लॉट ची मोजणी दि. 10.7.2005 ला करण्यात आली होती त्या मोजणी नकाशाची क प्रत शिट नं. 41 ए, प्लॉट नं. 494 प्रमाणित प्रत 1 ट्रेसिंग पेपरवर

2. गोंदिया नझूल शिट नं. 41 ए, प्लॉट नं. 494 चा भाग नकाशाची प्रमाणित प्रत 1 ट्रेसिंग पेपरवर

3. गोंदिया नझूल शिट नं. 41 ए, प्लॉट नं. 498 चा भाग नकाशाची प्रमाणित प्रत 1 ट्रेसिंग पेपरवर

4. नझूल शिट नं. 41 ए, प्लॉट नं. 494 पैकीवर श्री गोदरु जागो लोणारे यांचे नाव नझूल अभिलेखात दर्ज करण्यात आले आहे त्या संपूर्ण अर्ज प्रकरणाची प्रमाणित प्रत 1

5. नझूल शिट नं. 41 ए, प्लॉट नं. 494 पैकीवर श्री रविन्द्र वल्द तनसूख वासनिक यांचे नाव नझूल अभिलेखात दर्ज करण्यात आले आहे त्या संपूर्ण अर्ज प्रकरणाची प्रमाणित प्रत 1

6. नझूल शिट नं. 41 ए चा पूर्ण नकाशाची प्रमाणित प्रत 1 ट्रेसिंग पेपरवर

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 24.7.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी दि. 13.8.2008 रोजी तीच माहिती मागितलेली दिसून येते. व त्याबाबत सुध्दा दि. 25.8.2008 राजी अपीलकर्ता यांना तीच माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 13.8.2008 व दि. 16.9. 2008 रोजी दोन प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येतात. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आलेली नाही. परंतु सहा. नझूल परिरक्षण भूमापक गोंदिया यांनी अपीलकर्ता यांना दोन्ही अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 22.8.2008 रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की मुद्या क्र. 4 चे संदर्भामध्ये गोदरु जागो लोणारे तसेच यशोदाबाई ज. सुरकलाल गणवीर हे त्या जमिनीचे मालक नाहीत अशी त्यांची माहिती आहे. व त्यामुळे त्यांना चुकीची माहिती दिलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की जमिनीच्या सर्व्हेच्या पुर्वी गोदरु जागो लोणारे यांचे नाव आहे. व यशोदाबाई ज. सुरकलाल गणवीर यांचे नाव आहे. सर्व्हे नंबरवर सुध्दा त्यांचे नाव आहे. व त्यामुळे मुळ मालक असतांना नाव दर्ज करतांनाचे कागदपत्र उपलब्ध नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की जागेचे मालक हे दुसरेच कोणीतरी आहे. परंतु तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालयात जी नोंद असेल त्याबद्यलची माहिती ही उपलब्ध होवू शकते. अपीलकर्ता यांना जर त्याबाबत चुकीची माहिती आहे असे वाटत असेल तर त्यांनी ती दुरुस्त करुन घेण्याकरीता उपसंचालक भूमी अभिलेख यांचेकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 च्या तरतुदीप्रमाणे अपील दाखल करुन न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहिल. परंतु या प्रकरणात माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
**दि. 18.5.2009**

**( विलास पाटील )**<br>
**राज्य माहिती आयुक्त,**<br>
**राज्य माहिती आयोग,**<br>
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1124—1126

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 721 / 2008.**

श्री कृष्णाजी हिरामणजी कुंभारे
माताघरे मोहल्ला जुनी मंगळवारी
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त आयुक्त 1
महानगर पालिका नागपूर
2) श्री एस. डी. कटयारमल
जन माहिती अधिकारी तथा
कर निर्धारक
कर व कर आकारणी विभाग
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.7.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारक यांचेकडे घर क्र. 981/982 कोणत्या बाजुने आहे त्याची संपूर्ण माहिती. आपल्याकडे उपलब्ध इ.वि.स. वर्षापासून ते 2007पर्यंत.

सदरची माहिती व्यक्तिशः तातडीने नोंदणीकृत शिघ्र घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 17.7.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की उपलब्ध झालेली माहिती ही बरोबर नसून त्या ठिकाणी प्रत्यक्ष घर नाही असे त्याचें म्हणणे आहे. परंतु कर निर्धारक तथा माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांचे कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे तीच माहिती उपलब्ध करुन देता येते. प्रथम अपील दि. 27.8.2007 रोजी केलेले आहे व त्यांचा निर्णय दि. 17.9.2007 रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते असा निर्णय दिलेला आहे. माहिती अधिकारी यांनी रेकॉर्ड दाखविला व रेकॉर्डनुसार माहिती दिल्याचे सांगितले असा निष्कर्ष काढलेला असल्यामुळे सदरचा निर्णय योग्य आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलाचा निर्णय योगय असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1127–1128

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 393/2008.**

श्री अशोक कुमार गुप्ता
सुमंत 10/जी गावंडे लेआउट स्नेहनगर
रिंग रोड नागपूर 440015. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री नाकाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जनरल मॅरेजर (सी)
मुख्याध्यापक (सी) जन.–2 MSPGC Ltd. (महाजनको)
कोराडी कॉम्प्लेक्स छिंदवाडा रोड
कोराडी 441111 नागपूर
2) श्री जी. एस. यादव
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता (सी)
800 MW Civil Construction Circle
MSPGC Ltd. (महाजनको) Nariman Bhawan CSTPS
Post Urjanagar जि. चंद्रपूर 442404 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता यांचेतर्फे ॲड. उमरे उत्तरवादी यांचेतर्फे ॲड. मोहरील यांनी युक्तीवाद केला.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.2.2008 रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

I have been wrongfully relived on promotion from 800 MW Civil Construction Circle Chandrapur w.e.f. 23.11.2007 A.N. neglecting my lawful submission dt. 19.11.2007 to forgo promotion In this connection –

a) Please inform under what authority and rules/regulations of company you have relived me prior to the decision of the competent authority viz. Managing Director MSPGCL Mumbai on my application dt. 19.11.2007 submitted through proper channel.

b) Xerox copies of rules/regulations authorization for your above action may please be provided.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 6.3.2008 रोजी उत्तर दिलेले दिसून येते. दिलेल्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांनी दि. 7.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 2.5.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध दिलेली नव्हती म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे वकील श्रीयुत उमरे यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की तत्कालीन अधिक्षक अभियंता यांनी जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे

नियमाची प्रत दिलेली नाही. अर्जदाराना जी माहिती आहे तीच माहिती त्यांनी नमुद केलेली आहे. त्यावर तत्कालीन अधिक्षक अभियंता हे माहिती अधिकारी नाहीत असे उत्तरवादी यांचे वकीलानी प्रतिपादन केले. परंतु तत्कालीन अधिक्षक अभियंता यांची जर माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती झालेली नव्हती तर त्यांनी उत्तर देण्याचे कारण नव्हते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाने अधिनियमाच्या कलम 5 प्रमाणे माहिती अधिकारी नियुक्त करावयाचे आहे. व माहिती दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी अधिनियमाच्या कलम 19 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांची आहे. व माहिती दिली नसेल तर अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहे. त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये अधिक्षक अभियंता यांनी माहिती दिलेली असल्यामुळे त्यांना माहिती अधिकारी समजणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा ज्या जन माहिती अधिका–याकडे अर्जच गेलेला नाही त्यास जबाबदार धरणे योग्य होणार नाही. व त्यामुळे तत्कालीन अधिक्षक यांचे म्हणणे एकून घेणे हे अधिनियमाच्या कलम 20 (1) च्या परंतूकाप्रमाणे बंधनकारक आहे. त्यावर तत्कालीन अधिक्षक श्री नाईक यांनी असे सांगितले की त्यावेळेस नवीन सर्कल सुरु झाले होते व कोणत्याही प्रकारचा कार्यालयीन सेटअप तयार झाला नव्हता व त्यामुळे तशाप्रकारची माहिती दिली गेलेली आहे. परतु नवीन सर्कल जरी तयार झाले असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही स्वयंस्पष्ट आहे व त्यामुळे फक्त नियमाची प्रत देणे अपेक्षित होते. कोणत्याही प्रकारची शोध घेवून काढून देण्याची आवश्यकता नव्हती. यावरुन मुळात माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे तत्कालीन अधिक्षक अभियंता हे शास्तीस पात्र आहेत व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जे दि. 6.3.2008 रोजी उत्तर दिलेले आहे ती मागितलेली माहिती नसेल तर तत्कालीन अधिक्षक अभियंता यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे तत्कालीन अधिक्षक अभियंता यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 250/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम त्यांचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करणत यावी.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **General Manager (C) O/o Chief General Manager (C) Gen-II MSPGCLtd. (MAHAGENCO) Koradi Complex, Chhindwara Road, Koradi 441111 Distt. Nagpur.** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.5.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1129–1132

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 735/2008.**

श्री लालदास सदाशिवजी तागडे

पो. खोडशिवणी

ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

मुख्यकार्यपालन अधिकारी

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

जिल्हा परिषद गोंदिया

2) श्री यु. एम. वाघाये

जन माहिती अधिकारी तथा

खंड विकास अधिकारी

पंचायत समिती सडक/अर्जुनी

ता. सडक/अर्जुनी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.7.2008 रोजी खंड विकास अधिकारी यांना माहिती अधिकारी म्हणून गिरोला ग्रा.पं. येथे लघु पाणी पुरवठा विभागाने दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत झालेल्या कामाची माहिती मिळण्याबाबत. सन 2004–2008.

त्या तपशिलात माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 5.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या माध्यमातून सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही. तसेच पत्रव्यवहार झालेला नाही. खंड विकास अधिकारी यांनी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही ग्रा.पं.स्तरावरील असल्यामुळे दि. 2.8.2008 रोजी मागविण्यात आलेली माहिती या कार्यालयाशी संबंधीत नाही ही माहिती ग्रा.पं.शी संबंधीत असल्यामुळे तेथील सचिव हे माहिती अधिकारी असल्यामुळे आपण त्यांचेकडून माहिती मागवावी करीता याद्वारे आपणास कळविण्यात येत आहे. त्याप्रमाणे ग्रा.पं. सचिव यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच समाज कल्याण अधिकारी गट अ जिल्हा परिषद गोंदिया यांनी सुध्दा दि. 10.9.2008 रोजी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये व त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे पत्राचे अनुषंगाने उत्तर दिलेले दिसून येते. तसेच कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद गोंदिया यांनी सुध्दा खंड विकास अधिकारी यांना दि. 17.9.2008 रोजी लघु पाणी पुरवठा अंतर्गतदलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत सन 2004–05 ला केलेले कामे अपूर्ण असून त्याबाबत मागितलेली माहिती आपल्या अधिपत्याखाली असल्यामुळे आपण आपले स्तरावर सचिव यांचेकडून वरील माहिती उपलब्ध करुन संबंधित अपील धारकास मुदतीच्या आंत पुरविण्यात यावी

व तसा अहवाल या कार्यालयास अवगत करावी व सदरच्या पत्राची प्रत सचिव ग्रा.पं. गिरोला हेटी व ग्रा.पं.सदस्य श्री एल.एस.तागडे यांनासुध्दा अग्रेषित केलेली दिसून येते. खंड विकास अधिकारी यांनी अपीलीय अधिकारी म्हणून दि. 13.10.2008 रोजी अपीलाची सुनावणी घेतली व त्यावेळेस उपविभागीय अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग उपविभाग नवेगाव बांध हे सुध्दा हजर होते व त्यावेळेस मोजमाप पुस्तिकेची झेरॉक्स प्रत कु. एस.डी.वाढई, सचिव ग्रा.पं.गिरोला यांना देण्यास निर्देश दिले. त्यांनी आज 13.10.08 ला मागितलेली माहिती देण्यात आली सदर कामाचे चौकशीची प्रत देण्यात आली. सदर अपील या स्तरावरुन निकाली काढण्यात आले. त्यावर सचिव ग्रा.पं.गिरोला, श्री एल.एस. तागडे ग्रा.पं.सदस्य गिरोला व अपीलीय अधिकारी खंड विकास अधिकारी अशी सही दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व तशी पोच दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1124—1126

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 733/2008.**

श्री मधुकर पांडूरंग ब्राम्हणकर
संजयनगर वार्ड क्र. 1 चिचगड रोड देवरी
ता. देवरी जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद गोंदिया
2) श्री टी. एस. कटरे
जन माहिती अधिकारी तथा
प्र. मुख्याध्यापक
सुभाष हायस्कुल डोंगरगाव (सावली)
ता. देवरी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक सुभाष हायस्कुल यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. सुभाष हायस्कुल डोंगरगाव (सावली) या माध्यमिक शाळेचा 2004–05 ते 2007–08 या चार शैक्षणिक सत्राचा अंकेक्षण अहवाल ची सांक्षांकित प्रत.

2. दुर्गा शिक्षण संस्था कुंभारटोली (आमगाव) या संस्थेचा सन 1993–94 ते 2007–08 पर्यंत 15 वर्षाचे अंकेक्षण अहवाल ची सांक्षांकित प्रत.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 17.7.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 2.मे 2008 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद गोंदिया यांनी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या पत्रानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. 6.9.2008 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद गोंदिया यांना अर्जदाराच्या अर्जातील विषय क.1 अन्वये संदर्भ क. 2 दि. 17.7.2008 नुसार माहिती पुरविण्यात आलेली आहे. विषय क.2 अन्वये मागितलेली माहिती संस्थेची असून संस्था हे स्वतंत्र प्राधिकरण असल्यामुळे त्यांचेशी निगडीत माहिती माझे अधिकार कक्षात नसल्याने अपीलकर्ता यांना परस्पर संस्थेशी संपर्क साधण्यासंबंधी कळविण्यात आले आहे. असे कळवून अपीलकर्ता यांना सुध्दा सदरचे पत्राची प्रतिलिपी दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेली माहिती अपूर्ण आहे या कारणास्तव अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहिती मिळाली परंतु ती अपूर्ण मिळाली. सन 2007–08 चे अंकेक्षण अहवाल मिळाला नाही. तसेच संस्थेची मागितलेली माहितीसुध्दा मिळालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की

अपीलकर्ता यांनी जेव्हा अर्ज केला होता त्यावेळेस म्हणजे दि. 3.6.3008 रोजी सन 2007–08 चे अंकेक्षण सुरु होते त्यामुळे अंकेक्षण अहवाल देता आला नाही. परंतु आता अंकेक्षण पूर्ण झालेले असल्यामुळे अहवाल देण्यास कोणत्याही प्रकारची अडचण नाही. परंतु दुर्गा शिक्षण संस्था हे स्वतंत्र प्राधिकरण असल्यामुळे व मुख्याध्यापक हे संस्थेचे जन माहिती अधिकारी नसल्यामुळे सदरची माहिती ते उपलब्ध करुन देवू शकत नाही व तसे अपीलकता यांनासुध्दा कळविण्यात आलेले आहे. तरीसुध्दा संस्थेला तसे कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी संस्थेकडे माहिती मागणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना सन 2007–08 वर्षाचे अंकेक्षण अहवाल हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे. तसे न केलयास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1127–1129

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 734/2008.**

डॉ. दिपराज पंढरीनाथ इलमकर
बॅक ऑफ इंडियाच्या मागे लाखनी
मु. पो. ता. लाखनी जि. भंडारा 441804 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती लाखनी
ता. लाखनी जि. भंडारा
2) श्री व्ही. बी. मने
जन माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (उद्योग)
पंचायत समिती कार्यालय लाखनी
ता. लाखनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी खंड विकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय लाखनी यांना दि. 28.2.2008 ला मे. ओजल राईस मिल लाखोरी ता. लाखनी जि. भंडाराचे निरिक्षण चमुद्वारे निरिक्षण केल्याबद्यलची अहवालाची प्रत एकुण 17 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 20.6.2008 रोजी माहिती अधिकारी श्री व्हि. बी. मने विस्तार अधिकारी (उद्योग) यांना पत्र देवून मागितलेली माहिती आपल्या कार्यासन संबंधातील असल्यामुळे त्वरीत तयार करुन विहित मुदतीत पुरविणे आवश्यक आहे असे कळविलेले दिसून येते. व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्याप्रमाणे माहिती अधिकारी पंचायत समिती लाखनी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक 10.6.2008 रोजी खालीलप्रमाणे उत्तर दिलेले दिसून येते.

वरील संदर्भिय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत आपला माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की खादी व ग्रामोद्योग आयोग विभागिय कार्यालय सदर नागपूर यांच्या पत्रानुसार दि. 28.2.2008 ला संयुक्त तपासणीसाठी कळविण्यात आलेले होते. मा. खंड विकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय लाखनी मार्फत माझी ( व्हि. बी. मने विस्तार अधिकारी (उद्योग)) संयुक्त चमुबरोबर राहण्यासाठी प्रतिनिधी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली होती.

दि. दि. 28.2.2008 ला 1. श्री बी.डी.जांभुळकर अेडीओ 2. श्री सी.पी.सिंग डि ओ 3. श्री अे.सी.भिमटे वित्त अधिकारी 4. श्री व्ही.ए गुरव जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी भंडारा 5. श्री एस.जी.बंसोड बॅक आफ इंडिया लाखनी चे शाख व्यवस्थापक 6. श्री व्हि. बी. मने विस्तार अधिकारी (उद्योग) पंचायत समिती कार्यालय लाखनी अशा एकुण 6 अधिका–याच्या चमुंनी दिपराज पंढरीनाथ इलमकर यांच्या ओजल राईस मिल गट नं. 383/2 पं.ह.नं.8 मु. लाखोरी च्या युनिटला भेट दिली व पाहणी करुन चर्चा केलेली

आहे. तसेच बॅक आफ इंडिया लाखनी यांच्या कडील श्री दिपराज पंढरीनाथ इलमकर यांच्या कर्जाचे कागदपत्र पाहीले तसेच एमएसईबी लाखनी च्या कार्यालयाशी चर्चा केली.

खादी व ग्रामोद्योग आयोग विभागिय कार्यालय सदर नागपूर यांच्याकडे आपली कर्जाची केस व कागदपत्रे उपलब्ध आहेत म्हणजे आपल्या युनिटची माहीती सदर कार्यालयाकडे उपलब्ध आहे. संबंधित संयुक्त तपासणी अहवाल त्या कार्यालयाकडून तयार करण्यात आलेला असून त्यावर चर्चा झाल्याप्रमाणे मी व संबंधितांनी सहया केलेल्या आहेत व खादी व ग्रामोद्योग आयोग विभागिय कार्यालय सदर नागपूर हे माहीती देणारे कार्यालय आहे. याची नोंद घ्यावी.

या कार्यालयाकडे आपला वा आपल्या युनिटचा कोणतेही प्रकरण वा माहीती उपलबध नाही मी ( व्हि. बी. मने विस्तार अधिकारी (उद्योग)) म्हणून वैयक्तिक रित्या वा संयुक्त चमुतील एक सदस्य म्हणून माहीती देणारे कार्यालय होवून शकत नाही माहीती संबंधित पात्र कार्यालयाकडूनच मागविली पाहीजे त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत या कार्यालयाकडून माहिती मिळु शकत नाही.

आपणास सुचवावेसे वाटते की आपल्या कर्जाची केस व पुढिल कार्यवाही करणारे खादी व ग्रामोद्योग आयोग विभागिय कार्यालय सदर नागपूर हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत माहीती देणारे कार्यालय आहे. व त्यांच्याकडून माहिती मागवु शकाल.

करीता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत आपला माहितीचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे या विषयावर पुनः पत्रव्यवहार करु नये.

उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2008 रोजी प्रथम अपील मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा खंड विकास अधिकारी पंचायत समिती कार्यालय लाखनी यांनी सविस्तर

कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दि. 11.8.2008 रोजी आपण मागितलेली माहिती या कार्यालयाशी संबंधित नसल्याने आपणास सदर माहिती देता येणार नाही असे खंड विकास अधिकारी यांनी निष्कर्ष काढून माहीती खादी व ग्रामोद्योग आयोग नागपूर यांचे कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी पंचायत समिती श्री व्हि. बी. मने यांनी दि. 10.6.2008 जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 19.6.2008 च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1130–1133

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 738/2008.**

श्री मोतीराम भदुजी ढेंगळे
साई मंगल कार्यालयामागे बावणे ले आउट वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) सौ. लता साळवे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) श्री आर. एल. फुलझेले
जन माहिती अधिकारी तथा
पंचायत समिती कार्यालय वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.1.2008 व दि. 29.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडे विशेष वेतन वाढीची रक्कम मिळणेबाबतच्या माझ्या दि. 21.2.2008 च्या अर्जाबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती प्रत्यक्ष यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 6.2.2008 रोजी देयकाच्या झेरॉक्स प्रतीची आवश्यकता असल्यास 14 रु. भरणा करुन झेरॉक्स प्रती व्यक्तीगत घेवून जाण्यास पत्र दिले होते. त्यावर दिनांक 29.2.2008 रोजी अपीलकर्ता यांनी पुन्हा अर्ज सादर केला. सदरचे पत्र दिनांक 1.3.2009 ला प्राप्त झाले व त्यावर दि. 14.3.2008 ला कार्यवाही करण्याबाबत पत्र देण्यात आले. त्यावर कक्ष अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडून पत्र दि. 29.7.08 अन्वये कार्यालयात प्राप्त झाले. दरम्यान अपीलकर्ता यांनी दि. 17.7.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना दि. 28.8.2008 रोजी सुनावणीस हजर राहण्यास पत्र देण्यात आले. व सुनावणीस दि. 1.1.96 ते 31.5.05 पर्यंतची विशेष वेतन वाढीची रक्कम तयार झाली असून बिलाची रक्कम रु. 15450/– असल्याचे सांगितले. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की माझे देयकाची रक्कम हे पूर्वीच देणे आवश्यक होते व ते का देण्यात आले नाही अशी मला माहिती पाहिजे. वास्तविक ज्या दिवशी माहितीचा अर्ज केलेला असतो त्या दिवशी काय वस्तुस्थिती आहे हे कळविणे माहितीच्या अधिकारात अपेक्षित असते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना देयक तयार असल्याची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु देयक का देण्यात आले नाही असा प्रश्न जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारला असता त्यांनी असे सांगितले की सदर बिलाची रक्कम मिळणेबाबत ढेंगळे यांनी मागणी केली परंतु अपीलकर्त्यानी सीमेंटच्या संदर्भात

गैरव्यवहार केले व ते सद्या निलंबीत असल्यामुळे श्री ढेंगळे यांना सदरील रक्कम देता येईल किंवा नाही याबाबत मा. प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चंद्रपूर यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात आले. मा. प्रकल्प संचालक यांचे पत्र क्र. जिग्राविय‍ं/चं./लेखा/2102/08 दि. 11.9.08 अन्वये मा. आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांचे चौकशी अहवालानुसार सिमेंट गैरव्यवहारातील वसूलपात्र रक्कम रु. 66424/– श्री एम. बी. ढेंगळे निलंबित मिस्त्री ग्रेड 1 वसूल करण्यात यावी असे कळविलेले असल्यामुळे सदरील विशेष वेतन वाढीची रक्कम रु. 14450/– अर्जदार यांना दिलेली नाही असा खुलासा त्यांनी केलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांना वस्तुस्थितीची माहिती आहे तरी सुध्दा त्यांनी सदरची माहिती मागितलेली आहे व त्याही बाबत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये त्यांना पुन्हा वस्तुस्थितीची जाणीव करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1134–1136

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 749/2008.**

श्री रामजीवन शिवशंकर मिश्रा
मु. पो. गोरेगाव दुर्गा चौक
जगत कॉलेज रोड बारेभवन
ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया
2) श्री एम. आर. खोत
जन माहिती अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा प्र.)
जिल्हा परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी

हजर आहेत. अपीलकर्ता यांनी मला पूर्ण माहिती मिळाली असून सदर प्रकरण नस्तीबध्द करण्यात माझी काही हरकत नाही असे आयोगापुढे लिहुन दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

नागपूर
**दि. 20.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1137—1138

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे्त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 750/2008.**

श्री सरदार बचनसिंग वल्द धन्नसिंह सोखी
एकता इंजिनियरिंग वर्क्स प्लॉट नं. 9 ए
सिध्दार्थ नगर टेका रोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर
2) श्री दिगंबर मेहेर
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक (प्र.)
नगर रचना विभाग
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.7.2008 रोजी माहिती अधिकारी नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे दि. 23.6.2008 रोजी अर्जदाराच्या वरील दिलेल्या आर्जदार कोणती कार्यवाही करण्यात आली त्याबाबत माहितीची सत्यप्रत अशी माहिती मागितलेली असून सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 27.8.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.9.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन त्यामध्ये दि. 23.6.2008 चे टेलीग्राम तक्रार व लेखी तक्रार यावर कोणती कार्यवाही केली याबाबत अपीलाचे कारण दिलेले आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे असे सांगितले तसेच अर्जाप्रमाणे चौकशी सुरु आहे व तसेच माहिती दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली माहिती योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.5.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1139–1141

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 748/2008.**

श्री विनराज सी. खाटेड
हॉटेल पॅसीफीक मागे रेल टोली
गोंदिया ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. एस. ठाकरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रादेशिक व्यवस्थापक
एफ.डी.सी.एम.लिमी. उत्तर चंद्रपूर प्रदेश
चंद्रपूर (वन विभाग)
2) श्री एस. बी. खैरनार
जन माहिती अधिकारी तथा
विभागीय व्यवस्थापक
एफ.डी.सी.एम.लिमी. ब्रम्हपुरी वन प्रकल्प विभाग
ब्रम्हपुरी ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी डी. एम. एफ.डी.सी. एम.लिमी. ब्रम्हपुरी यांचेकडे लाकूड विक्रीच्या संदर्भामध्ये नियमाच्या प्रतीची मागणी करुन 2 मुद्यांमध्ये प्रश्नोत्तराच्या स्वरुपामध्ये माहिती मागितलेली दिसून येते.
अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 31.7.2008 रोजी माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यावर तारीख नाही. प्रथम अपीलामध्ये प्रश्नोत्तराचे अभिप्राय दिले नव्हते. मात्र नियम दिलेले आहेत व म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 12.8.2008 रोजी निर्णय दिलेला असून माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. व त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांना नियमाच्या स्वरुपात माहिती मिळाली असली तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे मात्र दिलेली नाही व ज्या पध्दतीनी लिलावाच्या संदर्भामध्ये कार्यवाही केली जाते ती नियमामध्ये दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांना माहिती ही अपुर्ण मिळालेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत त्याप्रमाणे कार्यवाही होत नाही तरी नियमाप्रमाणे कार्यवाही होते. अपीलकर्ता यांचे म्हणणे प्रमाणे नियमाप्रमाणे कार्यवाही होत असल्यास त्यांना लिलावाच्या वेळेस हरकत घेता येईल व त्यामुळे नियमाची प्रत उपलब्ध झाली असल्यास तसे अधिनियमाच्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' व (त्र) प्रमाणे ''माहितीचा अधिकार'' या दोन संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्रे, अभिलेखे इ.ची माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे व सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.5.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1142–1144

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 745/2008.**

श्री जगदीश कृष्णराव घाटोले
के.ऑफ श्री के.एम.घाटोले
टी.बी.टोली गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डॉ. एस.पी.चापले
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती मोहाडी
ता. मोहाडी जि. भंडारा
2) श्री के. आर. राउतकर
जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय वरठी
ता. मोहाडी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.4.2008 व 19.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेकडे एकच माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 26.3.2008 रोजी पत्रामध्ये खोडतोड असल्यामुळे आपण ठराविक अक्षरात माहीती मागणी करावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक 16.4.2008 रोजी आपणास माहिती पुरविण्यात येत आहे तरी सदर प्रती कागद 2 रु. फी भरुन आपणास पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना दि. 8.7.2008 रोजी रु. 15 प्राप्त झाले व त्यानुसार माहिती पुरविण्यात येत आहे असे लेखी दिलेले दिसून येते. दरम्यान अपीलकर्ता यांनी दि. 18.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतू अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतू सदरची माहिती ही विलंबाने उपलब्ध झालेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या अर्जात मागितलेली माहिती स्पष्टपणे दिसून येत नव्हती त्यामुळे त्यांना पत्र दिले त्यानंतर अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे पत्र दिले. परंतू अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी दि. 26.4.2008 रोजी रु. 15 चा भरणा केलेला असून सुध्दा त्यांना माहिती मात्र विलंबाने देण्यात आली. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी व्यक्तीशः माहिती मागितली होती व माहिती उपलब्ध करुन घेण्यास स्वतः येतील त्याकरीता वाट बघितली म्हणून माहिती उशिरा देण्यात आली. परंतू अपीलकर्ता यांना माहितीचा खर्च सुध्दा योग्य रितीने कळविलेला नव्हता असे दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अर्जावरील कार्यवाही ही नियमाप्रमाणे केलेली नाही असे दिसून येते. व त्यामुळे त्यांना समज देणे

आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनीसुध्दा अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केले आहे असे दिसून येत व त्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत योग्य ती कार्यवाही केलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येते तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनासुध्दा समज देण्यात येते व यापुढे अशाप्रकारे विलंबाने माहिती देत असल्याचे आढळल्यास त्यांचेविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1145–1147

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 392/2008.**

श्री अरुण जगन्नाथराव गेडाम
''जगन्नाथश्री'' 13 अ वंजारीनगर
पो. अजनी नागपूर 440003. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (दक्षिण)
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.5.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

i) Please refer to your letter No.SE/inf.Act/212 dt. 26.4.2005 & advice action taken as per para 4 of letter.

ii) How many plots in Nagpur city have construction in the margins inclu.Vanjari nagar layout, how many are regularized or demolished by NIT.

iii) Why my out house was demolished by NIT in 2001 but not other so called unauthorized Wanjari nagar construction.

iv) Pradip Ganguly Dy.Eng NIT had collected a check for Rs. 5000/- towards expenses which was dishourned & therefore my outhouse was demolished. Hense I had requested for enquiry against corruct Eng. Ganguly, Please advise action taken on my application dt. 28.4.2001 addressed to the Chairman NIT Nagpur.

v) Please supply papers necessary to be field for allotment of conservancy lane behind my plot No. 13 A in Vanjari nagar. The N.M.C.does not have above information.

सदरची माहिती रजिष्टर पोष्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 25.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 28.4.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दि. 10.5.2008 पर्यंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 30.5.2008 रोजी माहितीच्या अतिरिक्त खर्चा रु. 24 चा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु

त्यानंतर अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा केला नाही मात्र राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती कोणत्या तारखेला मागितली याबद्यलचा उल्लेख केलेला नाही. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर दि. 30.5.2008 च्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे त्यांनी उल्लेख केलेला नाही व खुलासाही आयोगाकडे आज केलेला नाही.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचा दि. 18.2.2008 चा अर्ज त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही व त्यामुळे त्यांना विहित मुदतीत माहिती देता आलेली नाही. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर माहितीच्याकरीता अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा हे कळविण्यात आलेले होते. परंतु कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णयातून दि. 10.5.2008 च्या आत माहिती द्यावयस पाहिजे होती. परंतु माहिती दि. 10.5.2008 च्या आत न देता दिनांक 30.5.2008 रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. वास्तविक खर्चाचा भरणा अर्ज प्राप्त झाल्यानंतर 30 दिवसाचे आंत कळविणे आवश्यक असते. अर्ज त्यांना पाठविलेला होता हे प्रथम अपीलाच्या निर्णयात दिसून येते. परंतु माहिती ही आदेशाप्रमाणे देणे आवश्यक होते. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर कोणत्याही प्रकारच्या खर्चाचा भरणा मागता येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती उपलब्ध असल्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत पाचही मुद्याच्या संदर्भामध्ये छायांकीत प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती पाठविण्यात यावी तसे न केल्यास जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1148–1151

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 396/2008.**

श्रीमती नंदा सुरेश मौंदकर
द्वारा श्री ए. आर. कावले
क्वार्टर नं. 47/6 टाईप II
ऑर्डनन्स फॅक्टरी भंडारा, जवाहरनगर 441906
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सिंचाई विभाग सिंचन भवन नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता (प्रशासन)
सिंचाई विभाग सिंचन भवन
सिव्हील लाईन्स नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.11.2007 तारीख असलेले परंतू कार्यालयात दि. 17.12.2007 रोजी सादर केलेल्या अर्जाच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी पाटबंधारे विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. List of the appointed persons who has appointed under compassionate department in Irrigation Department from 2001 to 2007

2. List of Death/Medical Boarded out employees of Irrigation Department from 2005 to 2007

3. Seniority list of the waiting persons for compassionate appointment for the above period

4. List of the Candidate who were called for interview on 29.11.2007 under compassionate ground and their date of proposal received at your end.

5. What is status of Ku. Swapna D/o S.M.Moundekar for compassionate appointment. Whether compassionate appointment done according to Seniority list.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 8.2.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांचे तर्फे असे सांगितले की त्यांना आतापर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 1.1.2008 रोजी पत्र पाठविण्यात आलेले आहे. जावक नोंदवहीचा पुरावा त्यांनी दाखल केलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांना पत्र मिळालेले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच अपीलकर्ता हे कार्यालयात दोन तीन वेळा गेले असता त्यांना अशा प्रकारचे पत्र दिले आहे हेही सांगण्यात आलेले नाही किंवा त्यांच्या संदर्भामध्ये यादीमध्ये 31 नंबर होता परंतु 31 नंबरच्या नंतरच्या उमेदवाराना नियुक्ती दिलेली आहे परंतु नंबर 31 यांना दिलेली नाही. याबद्यल त्यांनी विचारले होते तेव्हा त्यांना असे सांगितले की मा. जिल्हाधिकारी यांचेकडची नोंदणी नसल्यामुळे नोटिस काढण्यात आलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की जुन्या यादीमध्ये अपीलकर्ता यांच्या मुलीचा नंबर हा 64 आहे. अनुकंपा तत्वावर पत्नीला नियुक्ती देता येते परंतु त्या सेवा शर्तीच्या अधीन नसल्यामुळे त्यांच्या मुलीला नियुक्ती मिळावी याकरीता त्यांनी अर्ज केलेला होता व त्याबाबतचे मार्गदर्शन शासनाकडून आवश्यक होते व ते घेण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे शासनाकडून मार्गदर्शन आलेले आहे व त्यांच्या मुलीला नियुक्ती देण्याबाबत मान्यता दिलेली असल्यामुळे त्यांच्या मुलीला नियुक्ती देण्यात येईल असे सांगीतले व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. खुलासा दाखल करतांना तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय हा तोंडी दिलेला आहे असा खुलासा सादर केलेला आहे. तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांना कायद्याची काहीही माहिती दिसत नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील जर आहे तर प्रथम अपीलाचा निर्णय हा लेखी असावयास पाहीजे हे सर्वसामान्य ज्ञान आहे परंतु दुदैवाने अभियंता असूनसुध्दा अशाप्रकारचे सामान्य ज्ञान त्यांना नाही यावरुन कार्यालयाचे कामकाज करण्याची त्यांना काही आस्था नाही हे दिसून येते. याबद्यलची नोंद त्यांचे वरीष्ठांनी घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.12.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा तक्रार झाल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य अभियंता सिंचाई विभाग सिंचाई भवन सिव्हील लाईन्स नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.5.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1152–1155

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 398/2008.**

श्री इमरान इनायतुल्ला चिश्ती
हॉटेल अल जम जमचे मागे, मज्जीतचे बाजूला
आझमशाहा चौक, सेन्ट्रल एव्हेन्यू रोड नागपूर 2. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त –1
महानगर पालिका नागपूर
2) श्री दिगांबर मेहेर
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक
नगर रचना विभाग
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.5.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी सहा. संचालक नगर रचना विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे पत्र दिनांक 3 सप्टेंबर 2007 चे अन्वये हॉटेल अल जम जम सेन्ट्रल एव्हेन्यू रोड नागपूर विरुध्द तक्रारी बाबत. आपल्याजवळ चौकशी आणि पडताळणी करीता पाठविण्यात आलेला आहे. त्यावर आपण केलेली आणि पोलीस आयुक्त यांना पाठविलेली कार्यवाहीची प्रतची साक्षांकीत प्रत मिळण्याबाबत. वरील उल्लेख केलेली सवीस्तर माहिती मिळण्याबाबत.

सदरची माहिती रजिष्टर पोष्टने घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 29.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 10.4.2008 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व हजर सुध्दा झाले नाही. व त्यामुळे 8 दिवसात मुद्येनिहाय माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यानंतरही माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.3.2008 रोजी मागितलेली माहिती लकडगंज झोन कार्यालयाकडून प्राप्त झाल्यानंतर आपणास देण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. व सदरच्या पत्राची प्रतिलिपी सहा. आयुक्त लकडगंज विभागीय कार्यालय यांना पाठविण्यात आलेली दिसून येते. परंतु त्यानंतर माहिती उपलब्ध झालेली नाही प्रथम अपीलाच्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झालेली नाही. परंतु अपीलकर्ता यांना दि. 29.4.2008 रोजी सहा. आयुक्त झोन क्र. 8 कडून आलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु ती माहिती अपीलकर्ता यांनी मागितलेली नाही असे त्यांचे म्हणणे असे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की

अपीलकर्ता यांनी एकच माहिती अनेक अर्जाच्या माध्यमातून मागितलेली आहे व त्यांना दि. 25.8.2008 रोजी सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही वेगळया स्वरुपाच्या संदर्भातून उपलब्ध झालेली आहे. व यावरुन अपीलकर्ता यांनी अनेक अर्ज दाखल केलेले आहे हे त्यांनी मान्य केलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी ज्या अर्जाच्या माध्यमातून माहिती मिळाली ते वगळून ज्या अर्जाच्या माध्यमातून तीच माहिती मिळाली नाही त्याबाबत मात्र द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अशाप्रकारे हा अधिनियमाचे तरतुदीचा गैरवापर असून शासकीय यंत्रणेस वेठीस धरण्याचा प्रकार आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1156–1158

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे्त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 404/2008.**

श्री नागो पुंडलिकराव गाणार

सिरसपेठ आशा भवन मागे

नागपूर 9 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती परतेकी

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्य.)

जिल्हा परिषद नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

माध्यमिक शिक्षण विभाग

जिल्हा परिषद नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे महात्मा ज्यातीबा फुले खैरी त. रामटेक जि. नागपूर

येथील स.शि. सौ.एन.व्हि.माथुरे व स.शि. कु. एम.आर.चिंचोळकर यांच्या नियुक्तीचे दि. 22.1.2003 ते दि. 3.10.2006पर्यंतच्या कालावधीत सादर केलेले मान्यता प्रस्ताव आपल्या कार्यालयीन टिपणीसह व आदेशासह प्रती.

सदरची माहिती टपालानेघेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 5.3.2008 ला शाळेने कोणकोणत्या दिनांकास या कार्यालयास प्रस्ताव सादर केला त्याचा क्रमांक व दिनांक दिल्यास व माहिती उपलब्ध असल्यास आपणास देण्यात येईल असे उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 3.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 8.9.2008 रोजी अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या संदर्भामध्ये त्यांच्या कार्यालयानी पाठविलेल्या एकुण सहा पत्राचा उल्लेख करुन आपण एकाही सुनावणीस उपस्थित झाले नाही करीता अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. तत्पूर्वी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला नाही म्हणून दि. 2.6.2008 रोजी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. त्यांनी खुलासा दाखल केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 5.3.2008 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील अचूक तपशिल मागितलेला होता तो त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेला नाही. प्रथम अपीलातसुध्दा कोणत्याही प्रकारचा अचूक तपशिल दिलेला नाही. व अपील सुनावणीस उपस्थित न राहता राज्य माहिती आयोगाकडे मात्र द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलासोबत सुध्दा कोणत्याही प्रकारचा तपशिल दिलेला दिसून येत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता आहे असे दिसून येत नाही व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील अचूक तपशिल हा जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी तसेच द्वितीय अपीलासोबत राज्य माहिती आयोगाकडे दिलेला नसल्यामुळे त्यांना माहितीची आवश्यकता नाही असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1159–1161

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 400/2008.**

श्री संजय विठ्ठलरावजी सत्येकार
जे.एन.रोड, आंबेडकर चौक, कन्हान
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री के. ई. बावनकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
गिरीपेठ नागपूर
2) श्री आर. बी. मानकर
जन माहिती अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**
वर्धा भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली

**( आदेश पारित दिनांक 22.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.2.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 5.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलाचा निर्णय हा दि. 11.4.2008 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र. 2478 दि. 5.3.2008 च्या पत्रानुसार आपण वारंवार माहितीच्या अधिकारात माहिती मागवित असल्याने त्यामागे जनहित नसल्याने अपीलकर्त्यास माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले आहे. आपण माहितीचा उपयोग जनहितासाठी करीत नसल्याने आपण मागणी केलेली माहिती आपणास पुरविता येत नाही. यास्तव आपला अपील अर्ज विचारात घेता येत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही. व जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 7.3.2008 रोजी यापूर्वीही आपण माहितीच्या अधिकारात माहिती मागविलेली असून आपणास पुरविण्यात आलेली आहे. आपण वारंवार माहितीच्या अधिकारात माहिती मागवित असल्याने त्यामागे जनहित नसल्याने अपीलकर्त्यास माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले होते असे सांगितले. परंतु अपीलकर्ता यांनी हीच माहिती पुर्वी त्यांनी मागितलेली आहे असे जन माहिती अधिकारी सिध्द करु शकले नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे स्वयंस्पष्ट आहे व त्यामुळे त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती

उपलब्ध करुन देणे हे आवश्यक होते. एकच माहिती अनेक अर्जाच्या माध्यमातून मागणी याला वारंवार माहिती मागणे असे म्हणतात. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे सदरची माहिती पूर्वी अपीलकर्ता यांनी मागितलेली होती ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे असे मात्र जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी हे आयोगाचे निदर्शनास आणू शकले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकुन घेण्यात आले. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता हे अनेक अर्ज वारंवार करीत असल्यामुळे व त्यांचा त्रास देण्याचा उद्येश असला तरी सदरची कार्यवाही ही योग्य रितीने केलेली नसल्याने ते शास्तीस पात्र आहेत. व शास्ती का लादण्यात येवू नये याकरीता त्यांचे म्हणणे ऐकून घेतले परंतू त्यांनी वरीलप्रमाणेच कारण दिले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 7.2.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 7.2.2008 च्या अर्जास माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येत आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती रु. 1000/— लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम ही जन माहिती अधिकारी यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल

करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>अपर आयुक्त एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गिरीपेठ नागपूर</u>** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 22.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1162–1165

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 772/2008.**

श्री तोराम हरीषकुमार नायडू
23 सप्तश्रृंगी विहार, एच. बी. इस्टेट
सोनेगाव नागपूर 440025 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त –1
नागपूर महानगर पालिका नागपूर
2) श्री दिगंबर मेहर
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक
नगर रचना विभाग
नागपूर महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक नगर रचना विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. Provide me with the teh.plans specification provided to Saptashrung Developer Pvt.Ltd as prescribed vide para (4) of the agreemenet dated 30.1.2004

2. Since Saptashrung Developer has sold all the 28 plots and even constructed on them please provide me copy of letter deed through which Saptashrung Developer has handed over open spaced free of cost of the corporation as per Para (E,F) of agreemenet dated 30.1.2004

3. Please provide me copy of letter deed through which Saptashrung Developer has completed all development work as per approved plat/agreement dated 30.1.2004

4. Please inform me whether Saptashrung Developer has completed with the condition of Para (F) of the agreemenet dated 30.1.2004 to the satisfaction of the corporation.

5. Please provide me copy of letter order through which Saptashrung Developer has permitted to sale 28 plots and construct on them.

6. Please provide me copy of letter order through which proportionately plot where released for sale and construction as per

Para (H) of agreemenet dated 30.1.2004

7. Please provide me copy of letters through which Saptashrung Developer has communicated to corporation each stages of completion of development work in advance.

8. Please provide me the information regarding which engineer was deputed to supervise the work of development as per Para (I) of agreemenet dated 30.1.2004

9. Please provide me copy of specification/designs approved by Executive Engineer of the corporation For construction of roads, storm water drains, sewer lines, water supply line and street light.

10. Street Light Poles in Saptashrung Vihar is laid as Para (L) of agreemenet provide me copy of letter order of approval given to Developers.

11. Inform me whether Saptashrung Developer has compiled with all the conditions of commencement certificate dated 6.1.2005 as required Para (R) of agreemenet dated 30.1.2004

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. 25.8.2008 रोजी माहिती ही झोनकडे उपलब्ध असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र दिलेले दिसून येते. व त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक 1.2.2008 रोजी अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध होती ती दिलेली दिसून येते. परंतू संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे

अपीलकर्ता यांनी दि. 30.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.10.2008 रोजी देण्यात झालेला असून अपीलकर्ता यांना दि. 16.10.2008 रोजी पुन्हा झोनकडून आलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी सुनावणीस आयोगास असे सांगितले की त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही तरीही त्यांनी प्रतिज्ञापत्र आयोगाकडे दाखल केलेले आहे. व त्यात कोणत्या प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही याबद्यलचे तपशिलवार वर्णन केलेले आहे. प्रत्येक मुद्याच्या संदर्भामध्ये माहिती योग्य आहे किंवा नाही हे तपासणे आयोगास शक्य होत नाही व माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावयाची असते. कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांचे मत येईल अशा प्रकारचे उत्तर अपेक्षित नसते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सप्तश्रृंग डेव्हलपर्स यांना कार्यकारी अभियंता यांनी कोणत्या प्रकारचे आराखडे मंजूर करुन दिले याबद्यलचा नकाशा त्यांना मिळाला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की जी माहिती झोनच्या नस्तीमध्ये उपलब्ध आहे तशी उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यांनी आयोगापुढे सुध्दा मुळ नस्तीमधील नकाशा निदर्शनास आणला आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांना जशी माहिती पाहिजे तशी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांची तक्रार ही तांत्रिक बाबीबद्यल दिसून येते. त्याकरीता अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली असेल त्याबाबत संबंधित योग्य त्या अधिनियमाच्या प्रमाणे सक्षम अधिका—याकडे तक्रार करुन त्यांना न्याय मिळवून घेता येईल. मात्र त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की इतर मुद्याच्या संदर्भात सुध्दा माहिती योग्यरित्या मिळालेली नाही. त्याकरीता अर्थातच

अपीलकर्ता यांनी संपूर्ण दोन नस्तीचे अवलोकन करावे व त्यातून जी माहिती हवी असेल ती उपलब्ध करुन घ्यावी अशी तयारी जन माहिती अधिकारी यांनी दाखविली त्यामुळे अपीलकर्ता यांचे शंकासमाधान होईल व माहितीपण त्यांना उपलब्ध करुन घेता येईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे नस्तीचे अवलोकन करण्याकरीता कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत तारीख व वेळ कळवून नस्तीचे अवलोक करावे.
2) अपीलकर्ता यांचा अर्ज आल्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी कळविलेल्या तारखेस व वेळेस दोन्ही नस्ती अवलोकनास उपलब्ध करुन

देण्यात यावे. व अपीलकर्ता यांना ज्या कागदपत्राची आवश्यकता असेल त्यांच्या छायांकीत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1167–1172

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 771/2008.**

श्री सुरेश तनसुख प्रजापती

रा. लोहारपुरा बजेरीया नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री के. ई. बावनकर

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

प्रकल्प अधिकारी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

सहा. प्रकल्प अधिकारी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

नगपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.6.2008 व दि. 17.9.2008 रोजी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

अनुदानित आदिवासी आश्रम शाळा खापरी त. कळमेश्वर जि. नागपूर या शाळेचा संचालकाचे पुर्ण कागदपत्र सन 1998 पासून आजपर्यंत सर्व कर्मचारीची नियुक्ती आणि संस्थेचे ठराव माया वासाडे कर्मचारी यांचे पूर्ण कागदपत्र शाळेचे अनुभव प्रमाणपत्र ठरावचे पूर्ण कागदपत्र सन 1998 ते आज दि. 30.6.08पर्यंत. 1. सन 1998 पासून आणि दि. 30.6.08पर्यंत नियुक्ती करण्यात आलेल्या सर्व कर्मचा–यांचे कागदपत्रांची प्रत देण्यात यावी. 2. संस्थेने मांडलेले संपुर्ण ठरावाची प्रत देण्यात यावी 3. कर्मचारी माया वासाडे यांचे पूर्ण कागदपत्र शाळेचे अनुभवाच्या दाखल्याची प्रत देण्यात यावी.

सदरची माहिती संस्थेच्या स्तरावरील असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. 13.8. 2008 रोजी संस्थेला माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता कळविले. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना अतिरिक्त खर्च किती लागेल याबद्यलची माहिती कळविली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या खर्चाची रक्कम ही अपीलकर्ता यांना कळविण्यात यावी असे कळविलयावर अपीलकर्ता यांना संस्थेनी खर्चाचा भरणा किती करावा हे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे संस्थेनी अपीलकर्ता यांना दिनांक 16.9.2008 रोजी रु. 11219/– चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु तत्पूर्वी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांना दिनांक 10.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यावर अर्जदार हे संस्थेचे उपाध्यक्ष असल्याने संस्थेने कळविल्यानुसार रक्कम जमा करुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे दिनांक 10.6.2008 रोजी अपीलकर्ता यांचा अर्ज हा फेटाळण्यात आलेला दिसतो व त्या निर्णया विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलात अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करण्याच्या संदर्भामध्ये मुद्या उपस्थित केलेला आहे परंतू त्याकरीता असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलमेमोमध्ये अपीलकर्ता हा दारीद्रय रेषेखालील असे नमुद केलेले आहे. परंतू त्यांच्या दि. 30.7.2008, 7.2.2008 च्या अर्जात दिनांक 10.9.2008 च्या प्रथम अपीलात दारीद्रय रेषेखालील नाही असे नमुद केलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता हे स्वतः प्रामाणिक नाही असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीच्या करीता अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व तो कळविलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना संस्थेनी मागितलेली माहितीच्या करीता अतिरिक्त खर्चाचा भरणा केलेला नसल्य सदरचे अपील हे खारीज करण्यात येते. खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1173–1175

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे्त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 770/2008.**

श्री गोपीनाथ कवडुजी भगत

53, जयभिम को.ऑप. हा>सिंग सोसायटी

चंद्रमणी नगर नागपूर 27. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीष जोशी

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

मुख्य अधिकारी

नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ

नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

मिळकत व्यवस्थापक

नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ

नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. 100 गाळे अल्प उत्पन्न गट, योजना म्हाडा वसाहत एम आय डी सी बुटीबोरी जि. नागपूर येथील गाळयाचा ताबा मिळण्याबाबत

2. या योजने अंतर्गत किती लोकांना गाळे वाटप करण्यात आले

3. एक रकमी पैसे भरुन गाळयाचा ताबा देण्याबाबत.

सदरची माहिती सर्वसाधारण टपाला द्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 30.9.2008 रोजी 100 गाळे अल्प उत्पन्न गट बुटीबोरी या योजनेच्या सर्व नस्त्या हया उच्च स्तरीय तपासणीकरीता प्राधिकरण मुंबई यांचेकडे पाठविण्यात आल्यामुळे त्यांच्याकडुन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या आदेशानुसार मंडळ पुढील कार्यवाही नियमानुसार करेल असे कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.11.2008 रोजी देण्यात आलेला असून संपूर्ण रेकॉर्ड प्राप्त होताच जन माहिती अधिकारी यांनी 15 दिवाचं आंत माहिती पुरवावी असा आदेश दिलेले दिसून येतो. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय हा अपीलकर्ता यांना दि. 8.5.2009 रोजी दिलेला दिसून येतो. त्यापूर्वी तो दिलेला नव्हता. याचा अर्थ अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 25.11.2008 रोजी निर्णय दिलेला नाही असे दिसून येते. व आयोगाची नोटीस आल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कनिष्ठ सहाय्यक यांनी सारवासारव करण्याची कारवाई केलेली दिसून येते. त्यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अधिनियमाचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते. दि. 25.11.2008 रोजी नोटशिट वर जो निर्णय आहे त्याप्रमाणे माहिती दिली नाही व यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे व त्यांनी निष्काळजीपणा दाखविलेला आहे असा

निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरीता जन माहिती अधिकारी तसेच कार्यालयातील संबंधित कनिष्ठ कर्मचारी ज्यांचे माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता सहाय घ्यावे लागते असे कर्मचारी यांना अधिनियमाच्या कलम 5 (4) (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते व त्यामुळे त्यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन शास्तीची वसुली करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी व त्यांनी ज्यांचे सहाय घेतलेले असेल असे कर्मचारी यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजुन त्यांचे विरुध्द प्रत्येकी रु. 250/– ची शास्ती लादण्यात येत आहे. सहाय घेण्यात येणा–या कर्मचा–याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित करावयाची आहे व शास्तीची रक्कम ही लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 9.9.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने व प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचं आत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा तक्रार आल्यास पुन्हा शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.5.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1176–1179

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 767/2008.**

श्री डॉ. राजेश माणिकरावजी नाईक
शिवाजी नगर, गणेश मंदीराजवळ चिटणवीसपुरा
महाल नागपूर 440032 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष
वाणिज्य महाविद्यालय ट्रस्ट यवतमाळ
के.ऑफ कला आणि वाणिज्य माहाविद्यालय
शिवाजी नगर यवतमाळ 445001
2) डॉ. आर. जी. चवरे
जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य
कला आणि वाणिज्य माहाविद्यालय
शिवाजी नगर यवतमाळ 445001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.12.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य कला आणि वाणिज्य माहाविद्यालय यवतमाळ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

दि.11 जूलै 2008 व दि. 22 ऑगष्ट 2008 रोजी आपल्या महाविद्यालयामध्ये वाणिज्य शाखेच्या अनु. जाती साठी राखीव असलेल्या तात्पुरत्या स्वरुपाच्या अधिव्याख्याता पदाकरीता झालेली प्रत्यक्ष मुलाखत. उपरोक्त मुलाखतीकरीता मला का बोलाविले नाही याबाबत सविस्तर व स्पष्ट माहिती मिळण्याबाबत.

सदरची माहिती नोंदणीकृत व शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.10.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.11.2008 रोजी देण्यात आलेला असून उच्च न्यायालयापुढे दाखल असलेल्या रिट पिटीशन क्र. 5096/2006 व 5521/06 चा अंतीम निकाल होईपावेतो अपिलार्थीने उच्च न्यायालयाचे अंतरीम आदेशाला बांधील राहून चुकीच्या पध्दतीने अज्र माहितीच्या अधिकारा अंतर्गत करु नये. व माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी त्या निर्णया विरुध्द द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये त्यांनी नंतरच्या जाहिरातीमध्ये अर्ज करु नये अशा प्रकारे कोणत्याही प्रकारे निर्णय दिलेले नाही. परंतु अपीलकर्ता यांच्या रिट पिटीशन क्र. 5096/2006 मध्ये त्यांनी जो अंतरीम न्याय मागितलेला आहे तो नाकारण्यात आलेला आहे. तसेच रिट पिटीशन क्र. 5521/06 मध्ये पुढील वर्षाकरीता कार्यवाही करावी अशा प्रकारे याचीकाकर्ता संस्थेचे म्हणणे मान्य केलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांनी जरी अर्ज केलेला असला

तरी त्यांचे मुळात प्रकरण हे न्यायप्रविष्ट असल्यामुळे संस्थेनी त्यांना मुलाखतीला बोलावू नये अशा प्रकारचा निर्णय घेतलेला असल्यामुळे तसे त्यांना कळविलेले दिसून येते. व तसे प्राचार्य यांनी कुलसचिव संत गाडगेबाब महाराज अमरावती विद्यापीठ यांना कळविलेले आहे हे दाखल केलेल्या पत्रावरुन दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुलाखतीकरीता का बोलाविले नाही याबद्यलचे कारण दिलेले आहे. सदरच्या कारणाच्या गुणवत्तेच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना जर शंका असेल तर अपीलकर्ता यांना त्यांच्या नवीन अर्जावर संस्थेनी जो निर्णय घेतला असेल त्या निर्णयाची छायांकीत प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. सदरचा निर्णय योग्य किंवा अयोग्य याबाबत अपीलकर्ता यांनी योग्य त्या सक्षम अधिका—याकडे तक्रार करणे संयुक्तिक राहिल. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1180–1183

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 783/2008.**

श्री राजेंद्र विष्णुपंत खाळे
गांधीनगर सरस्वती कॉन्व्हेंटच्या मागे
मु. पो. पुलगाव ता. देवळी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर नाहीत व कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दि. 5.4.99 ला शिक्षक मिडल स्कूल या पदाचा

राजीनामा दिला माझ्या राजीनाम्याची शाळा समितीने मंजुर करुन मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना पाठविलेली सत्यप्रत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 11.8. 2008 रोजी पुन्हा राज्य जन माहिती अधिकारी शिक्षणाधिकारी यांचंकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व अर्ज मात्र पोष्टाने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचंकडे पाठविलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी राजीनामा हा संस्थेकडे दिलेला असल्यास सदरची माहिती ही संस्थेकडे उपलब्ध होवू शकते. तरीसुध्दा सदर राजीनाम्याची प्रत या कार्यालयामध्ये पाठविणेबाबत मुख्याध्यापक यांनी या कार्यालयाचे दि. 2.8.08 व स्मरणपत्र दि. 27.8.08 अन्वये कळविले होते. परंतु शाळेकडे सदर माहिती अद्याप अप्राप्त असल्यामुळे अर्जदारास माहिती पुरविण्यात आलेली नाही.

4. तसेच प्रथम अपील हे अपीलकर्ता यांनी पुन्हा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे केलेले आहे व पोष्टाने मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचेंकडे पाठविलेले आहे. व त्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही ही चुक अपीलकर्ता यांची आहे. अपीलकर्ता यांनी सुध्दा माहितीचा अर्ज किंवा प्रथम अपीलाचा अर्ज हा योग्य त्या सक्षम अधिका—याकडेच दाखल करणे आवश्यक असते.

5. वास्तविक अपीलकर्ता हे शिक्षण संस्थेच्या सेवेत कार्यरत असल्यामुळे त्यांच्या संदर्भातील सर्व माहिती करीता शिक्षण संस्था हे सार्वजनिक प्राधिकरण आहे. त्यांनी राजीनामासुध्दा संस्थेकडे दिलेला आहे असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे संस्थेच्याकडे जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती

मागणे आवश्यक आहे. उपशिक्षणाधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे परंतु कार्यालयाची पत्रे मुख्याध्यापकानी दिलेले आहे. संस्थेतील माहिती ही मुख्याध्यापक देवू शकणार नाही हे सर्वसामान्य ज्ञान आहे. अपीलकर्ता यांनी संस्थेकडे माहिती मागावयास पाहिजे होती हे खरे असले तरी संस्था ही अनुदानीत असल्यामुळे उपशिक्षणाधिकारी यांचा त्यांच्यावर नियंत्रण असल्यामुळे संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना माहिती पुरविणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 16.6.2008 अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही संस्थेकडून जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी उपलब्ध करुन घेवून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

अन्यथा संस्थेच्या विरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.5.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.1184–1187

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 780 / 2008.**

कु. सरीता रुपचंद दाते
प्लॉट नं. 32 अ, गुरुदेवनगर (आशिर्वाद नगर बस स्टॉपजवळ)
हुडकेश्वन नगर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एम. हस्ते
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.9.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय यांचेकडे दि. 13.5.2008 रोजी प्रसिध्द झालेल्या जाहिरातीनुसार गुणानुक्रमे गुणासहीत लेखी परिक्षेची यादी तसेच मुलाखतीचे गुणाची यादी मिळणेबाबत.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 18.9. 2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती गोपनिय बाब असल्याने नियम क्र. 8 (1) (झ) अन्वये पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.10.2008 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही परीक्षा संपून निर्णय झालेला असल्यामुळे त्याबाबतची माहिती ही गोपनिय माहिती म्हणून 8 (1) (झ) अन्वये प्रकट करण्याच्या संदर्भामध्ये अपवाद करता येणार नाही. प्रत्येक उमेदवारास दिलेले लेखी गुण व मुलाखतीचे गुण हे प्रकट करण्यास हरकत असता कामा नये व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलामध्ये नवीन माहिती मागितलेली असल्यास ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 2.9.2008 च्या अर्जात मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1188–1190

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 779/2008.**

श्री माधव केशवराव जिवतोडे
मु. वडेगाव पो. गुळगाव
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन) नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय वनभवन नागपूर
2) श्री अरुण कुमार चौबे
जन माहिती अधिकारी तथा
वनसंरक्षक (मानव संसाधन विकास)
वनविभाग नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय वनभवन नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय वनविभाग महाराष्ट्र राज्य यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

16 मार्च 1992 अन्वये स्थापन झालेल्या वन संरक्षण समित्याची माहिती मिळण्याबाबत. 16 मार्च 1992 ते 20 जून 2008 पर्यंत. 1. राज्यात एकुण वनवृत्त वनविभाग वनपरिक्षेत्र राउंड, बीट अंतर्गत किती वनसंरक्षण समित्याची स्थापना झाली. त्याची माहिती 2. या समित्यापैकी किती समीत्यांना 16 मार्च 1992 च्या परिपत्रकान्वये 50 टक्के वाटा देण्यात आला त्याची माहिती. 3. 16 मार्च 1992 च्या परिपत्रकान्वये त्या वनसंरक्षण समित्याना अजूनपर्यंत 50 टक्के वाटा का देण्यात आला नाही त्याची माहिती. 4. 50 टक्के वाटा देण्यासाठी आजपर्यंत प्रत्येक स्तरावरुन प्रत्येकी किती बैठका घेण्यात आल्या त्याची माहिती. 5. प्रशासनाच्या धोरणाचे शासकीय अधिका—यांनी पालन न करणे हे ऑफीस कामातील दिरंगाई नाही काय त्याची माहिती 6. त्यांचेवर कोणती कारवाई करणार त्यांची माहिती देण्यात यावी.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु अर्जाच्या अनुषंगाने दि. 20.10.2008 रोजी काही माहिती उपलब्ध झाली व त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्यांनी 30 दिवसाचं आत संपूर्ण मिळाली नाही तर टप्प्याटप्प्याने मिळत आहे व अजूनही संपूर्ण माहिती मिळाली नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की वनक्षेत्रामध्ये एकुण 16 हजार गावे आहेत व सदरची मागितलेली माहिती महाराष्ट्रातील त्याच वनविभागातील असल्यामुळे एकत्रित संकलित नाही व ती त्या त्या वनविभागाकडून उपलब्ध करुन घेवून पुरविता येणे शक्य

होते व त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी सर्व वनविभाग व उपवनविभाग यांना पत्रे देवून माहिती मागितलेली होती असे सांगितले. व त्यामुळे जशी माहिती ज्या ज्या विभागाकडून उपलब्ध झालेली आहे तशी माहिती अपीलकर्ता यांना दिलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे प्रमाणे सदरची माहिती दि. 4.12.2008, 20.3.2009, 14.5.2009, 18.5.2009 व 22.5.2009 ला उपलबध करुन देण्यात आलेली आहे तरीही माहिती उर्वरीत आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे बुलढाणा जिल्हयाची माहिती तयार आहे व नंदुरबार वनविभागातील माहिती उपलब्ध होत आहे व ती उपलब्ध झाल्याबरोबर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

4. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती वर नमूद केल्याप्रमाणे अतिव्यापक प्रमाणात आहे. एकाच वनविभागाच्या अंतर्गत अनेक उपविभाग असल्यामुळे त्या त्या स्तरावर ती माहिती उपलब्ध असते व त्यामुळे त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरची माहिती मागतांना त्या त्या विभागाकडे मागितली जाणे आवश्यक असते. जेणेकरुन ती 30 दिवसाचे मुदतीत उपलब्ध होईल. परंतु एकाच माहिती अधिका–याकडे संपूर्ण महाराष्ट्रातील वनविभागातील माहिती मागितल्यास ती उपलब्ध होते परंतू त्यास विलंबा होतो. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत सर्वच उपविभागांना पत्रे दिलेली असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे किंवा विलंब लावलेला आहे असे म्हणता येणार नाही. तरीसुध्दा काही माहिती जर उपलब्ध झालेली नसेल तर त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 2.9.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उर्वरीत आहे ती माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1191–1194

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 796/2008.**

श्री मुरली उर्फ अशोक रेड्डी
यु.टी.नं. 3478, अंडा बैरक,
नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक
नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर
2) श्री जे. बी. मिश्रा
जन माहिती अधिकारी तथा
नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हे जेल मध्ये आहेत. त्यांनी सुनावणीस हजर राहण्याकरीता विनंती केली होती परंतू जल अधिका—यांनी अपीलकर्ता हे नक्सलाईट असल्यामुळे व सुरक्षिततेच्या कारणास्तव त्यांना जेल मधून आणणे धोकादायक आहे असे आयोगाचे निदर्शनास आणल्यामुळे अपीलकर्ता यांची विनंती मान्य केली नाही. तसेच माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हि

सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची अधिनियमाच्या कलम 19 (5) अन्वये असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या कागदपत्राच्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली किंवा नाही याबद्यलची माहिती करुन घेता येते व त्यामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव अपीलकर्ता यांचे कागदपत्रावरुन आयोगानेच जन माहिती अधिकारी यांना माहितीच्या संदर्भामध्ये सिध्द करण्यास सांगितले. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.11.2007 रोजी शासकीय सुचना अधिकारी नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर यांचेकडे एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. परंतु सदरच्या अर्जास 10 रु.चे तिकिट लावलेले नव्हते त्या कारणास्तव माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे दिसून येते. परंतु अपीलकर्ता हे जेल मध्ये असल्यामुळे त्यांना उत्पन्नाचा कोणताही स्त्रोत नसल्याने 10 रु.चे तिकिट लावू शकत नाही असे सांगितले. परंतु अधिनियमाच्या कलम 7 (7) प्रमाणे त्यांना मदत करणे आवश्यक आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 19.2.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा करतांना दिला आहे.

1. जेल मॅन्युअल और समय–समय पर कीया गया अमेटमेंट विविरण मागीतले सदर बंदयाने जरी जेल मॅन्युअलची मागणी केली तरी सदर बंदयास व इतरही बंदयाना जेल मॅन्युअल देणे शक्य नाही. त्या ऐवजी बंदयाना आवश्यक ससनारी माहिती असलेले महाराष्ट्र कारागृह विभागाने गजाआडच्या जगात हे पुस्तक बंदयास कारागृहात दाखल झाल्यावर पूर्विच देण्यात आलेले आहे.

2. सूचना अधिकार अधिनियम 2005 नियमावली सदर सूचना अधिकार अधिनियम 2005 ही नियमावली या कारागृहात उपलब्ध नसल्यामुळे व बंदयाचे सहआरोपीचे यांचे नातेवाईकाचे भेटीचे वेळी त्यांचे कुटुंबियानी आणलेले सदर नियमावलीचे पुस्तक बंदयास देण्यात आलेले आहे.

3. जेल प्रशासन और महाराष्ट्र शासन द्वारा प्रतिबधीन कीया गया साहित्य सुची या दोन्ही बाबीच्या माहितीसाठी कारागृहातील सर्व बंदयाना आवश्यक तेवढी माहिती प्राप्त होण्याचे दृष्टीने बंदयासाठी तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कारागृह विभागाचे गजाआडच्या जगात हे पुस्तक बंदयास कारागृहात दाखल झाल्यावर यापूर्विच देण्यात आलेले आहे.

4. मुल्ला कमेटी सिफारिसो का महाराष्ट्र शासन और जेल प्रशासन को क्या अमल कीया जा रहा है विवरण. या बाबतीत स्पष्ट करण्यात येते की, मा. मुल्ला कमेटीच्या सिफारसी अमलात आणणे हे शासकीय धोरण असून यावर निर्णय घेण्याचा अधिकार हा फक्त शासनास आहे. करीता या बाबत कुठलीही माहिती या कार्यालयाकडून उपलब्ध होवू शकणार नाही. सदर माहिती उपलब्ध नसल्यामुळे नक्षलवादी बंदयास देण्यात आली नाही.

5. जेल मे बंदी व्यक्तीवर प्रती दिन का खर्च विवरण

सदरील माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम क. 8 मधील पोटनियम क.1 यातील उपनियम (ज) अन्वये देता येत नाही असी या कार्यालयाची धारणा आहे. सदर बंदयाने महाराष्ट्र शासन राजपत्र असा/18 नोव्हेंबर 2005 (भाग चार – अ) जोडपत्र (नियम–3) अन्वये रु. 10/– कोर्ट स्टॅम्प असलेला अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळविण्यासाठी अर्जाच्या नमून्यामध्ये अर्ज दयावयास पाहिजे होता. परंतू सदर बंदयाने साध्या कागदावर अर्ज दिला आहे. तरी सुध्दा बंदयास आवश्यक असलेली माहिती बंदयास देण्यात आलेली आहे. यानंतर या संबंधात बंदयाने

कार्यालयास किंवा अधीक्षका समोर याबाबत कोणताही विनंती केली नाही. यांनंतरही सदर बंदयाने दि. 19.12.2007 ची सही असलेला साध्या कागदावर अर्ज दि. 7.1.2008 रोजी अधीक्षकाचे समक्ष घेण्यात आला. सदर बंदयाने हया वेळी

1. जे मे बंदी बंदीयोने देश मे पंजीकृत दैनिक पेपर और पत्रीकायो को अपना मत और लेख भेजने का अधिकार आय पी सी व मॅन्युअल मे प्रावधान क्या है/उस का विवरण

2. बंदीयो के लिये जानेवाली रेशन ऑर कॅन्टीन मे सामान सालय का टेंडरो का विवरण ही माहिती मागीतली.

सदर बंदयास या कार्यालयाचे पत्र क्र. माहिती अधिकारी/1683/2008 दि.18.2.2008 अन्वये माहिती देण्यात आलेली आहे.

यानंतरही सदर बंदयास कारागृह नियमावली अंतर्गत न्यायाधीन बंदयाना मिळणा–या कारागृहीन सवलती बाबत कारागृह नियमावलीमध्ये असलेल्या नियमाचे छायांकीत प्रती काढूण या कारागृहाचे पत्र क्र. ना.क.का/5614/2008 दि. 12.6.2008 अन्वये देण्यात आलेला आहे. याउलट सदर पत्रावर 45 वर्षे मे क्या क्या संशोधन हुआ है ही माहिती मागीतली.

यावरुन आरोपीस सदरची माहिती उपलब्ध झाली याबद्यलची पोच सुध्दा त्यांनी त्यांच्या रजिस्टरवरुन आयोगाचे निदर्शनास आणले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 27.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1205–1209

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 791/2008.**

श्री अधिक नत्थूजी आत्राम
रा. सोनेगाव पो. खडसंगी
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री भाउराव सं. खामतकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा साधनगट प्रमुख
जलस्वराज्य प्रकल्प चंद्रपूर
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

2) श्री गणेश श्रावण नन्नावरे
जन माहिती अधिकारी तथा
जलस्वराज्य प्रकल्प सोनेगाव (वन)
पो. खडसंगी ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.6.2008 रोजी श्रीमती रेखा तुकाराम नन्नावरे यांचेकडे जन माहिती अधिकारी म्हणून जल स्वराज प्रकल्पाची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून जिल्हा साधनगट प्रमुख जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचा दि. 4.6.2008 चा अर्ज हा जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध झाला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी अर्ज स्विकारला नाही याबद्यलचे रजिस्टर पोष्टाचे पाकीट दाखविले परंतु सदरचे पाकीटावर पोष्टाचे स्टॅम्प नाही तसेच सुरुवातीची जी तारीख आहे तीच तारीख ही 10 व्या महिन्याची दिसून येते व त्यामुळे सदरचा अर्ज हा जन माहिती अधिकारी यांना मिळाला नाही हे त्यांचे म्हणणे खरे आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर नव्हते व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या प्रथम अपीलात मागितलेल्या माहिती प्रमाणे त्यांच्या दि. 4.6.2008 च्या अर्जात मागितलेल्या माहिती प्रमाणे जल स्वराज योजनेची माहिती हा निर्णय

मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 27.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1210–1212

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 790/2008.**

श्री रामू गणपत चौधरी
रा. सोनेगाव पो. खडसंगी
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री आय. आर. मारबते
जन माहिती अधिकारी तथा
निवडणूक अधिकारी
विविध कार्यकारी सहकारी संस्था खडसंगी (र.नं.803)
पो. खडसंगी ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 27.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.3.2008 रोजी निवडणूक अधिकारी विविध कार्यकारी सहकारी संस्था खडसंगी माहिती अधिकारी म्हणून एकुण पाच मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. सन 2007–08 मध्ये विविध कार्यकारी संस्था खडसंगी चे निवडणूक प्रक्रिया चालू असलेल्या दि. 4.3.2008 ला नामनिर्देशन फार्म किती विक्री झाली याची प्रमाणित प्रत देण्यात यावी

2. दि. 5.3.2008 ला 12 ते 4 वाजेपर्यंत किती नामनिर्देशन फार्म आले त्याच्या झेरॉक्स प्रत प्रमाणित करुन मिळण्याबाबत.

3. दि. 5.3.2008 ला 5 वाजता नंतर नामनिर्देशन अर्जाची प्रसिध्द झालेली यादी देण्याबाबत

4. माहिती अर्जदाराजवळ देण्यात यावी

5. सर्व नामनिर्देशन पात्र झालेल्या अर्जाला जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र जोडले असल्याबाबतच्या सत्यप्रती.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 1 ते 4 ची माहिती दि. 7.3.2008 रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु मुद्या क्र. 5 ची माहिती मात्र अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली नव्हती व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 17.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्याप्रमाणे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था चिमूर यांना दि. 23.6.2008 अन्वये माहिती मिळवून देण्यास निर्देशित करण्यात आलेले होते व त्यानुसार सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. चिमूर यांनी दि. 3.7.2008 रोजी अपीलकर्ता यांना रु. 87/– चा भरणा करावा व माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते पैसे भरण्यास गेले होते परंतु पैसे भरुन घेतले नाही व माहिती देण्याची टाळाटाळ केली. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी असे सांगितले की सदरची माहिती आता ती विविध सहकारी

संस्थेमध्ये आहे व त्या संस्थेकडून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी लागेल. विविध सहकारी संस्था यांचेकडे निधीची उपलब्धता नसते व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रु. 87/– चा भरणा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे रु. 87/– चा भरणा करण्यास अपीलकर्ता तयार आहे असे त्यांनी सांगितले. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ता. चिमूर यांच्या दि. 3.7.2008 च्या पत्राप्रमाणे रु. 87/– चा भरणा त्यांचे कार्यालयात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत करावा व अपीलकर्ता यांनी पैसे भरल्यानंतर 10 दिवसाचे आंत संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना पुरविण्यात यावी. अपीलकर्ता यांनी सदरची माहिती व्यक्तीशः घ्यावी व पोच द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 27.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1213–1215

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 803/2008.**

श्री भगवानदास बालमुकुंद भगवानदास
प्रो.प्रा.गुप्ता फोटो स्टुडिओ, एनएमडी कॉलेज जवळ
गायत्री मंदीर रोड गोंदिया
ता. जि. गोंदिया 441614 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक
गोंदिया
2) श्री सतिश शं. शिंगटे
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक (मुख्य)
गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून पोलीस अधिक्षक गोंदिया यांचेकडे अर्जदाराच्या फोटोग्राफीचे थकीत बिलबाबत विषयांतर्गत पत्रावर झालेल्या कार्यवाहीचा तपशिल. प्रस्तुत देयके व केलेल्या भुगतानचे अहवालाची प्रत मिळणे. थकीत रक्कम 48740/- बाबत दि. 18.3.2008 ला दिलेल्या अर्जावर कार्यवाहीचा तपशिल. नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 9.7.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अपीलकर्ता यांचा अर्ज कार्यालयातील कक्ष-3 कडे अर्ज देवून अर्जदारास संबंधीत लिपीकाकडे बिलांची स्थळप्रत उपलब्ध असल्यास पुन्हा एकदा शहानिशा करण्यास समक्ष कळविण्यात आलेले होते. अर्जदारानी फोटोग्राफीचे थकीत बिलाबाबत जन माहिती अधिकारी पोलीस उपअधिक्षक (मुख्य) गोंदिया यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आला होता. थकीत बिल मिळण्यात यावे याकरीता मा. जिल्हाधिकारी गोंदिया यांचेकडे दि. 6.9.2006 रोजी पोलीस विभागाकडून मिळाली नसल्याचे अर्ज दाखल केल्याने बिलाबाबत पडताळणी करण्यात आली असता कार्यालयाचे अभिलेखावरुन अर्जदाराला रु. 91893/- च्या बिलाची भुगतान करण्यात आली आहे. व त्यांना दि. 2.11.2006 रोजी कळविल्याचे रेकॉर्डवरुन दिसून येते. पत्रव्यवहार करण्यात आला होता. अपीलकर्ता यांनी दर्शविल्याप्रमाणे थकीत बिलाच्या प्रकरणात दीर्घकालावधी म्हणजे 4-5 वर्ष झालेली आहेत असाही खुलासा केलेला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व म्हणूनच अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात आलेले होते. यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असले तरी अपीलकर्ता यांचेकडे काही देयके

प्रलंबित असल्यास त्या देयकाच्या छायांकीत प्रती व तपशिल त्यांनी संबंधीत कक्षास देवून पुन्हा शहानिशा करुन घेणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 28.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1216–1218

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 804/2008.**

श्री ॲड. आनंद प्रकाश दुबे

13 राजेश्वरी पार्वतीनगर नागपूर 27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री धिरज कुमार

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अति.जिल्हाधिकारी

नागपूर

2) श्री प्रसाद मते

जन माहिती अधिकारी तथा

खनिकर्म विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.5.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. नागपूर जिल्हयातील कोण कोणते क्षत्र उत्खनन क्षेत्र मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. तसेच शासकीय भुमीवर किती व्यक्ती कर्म संस्था ला पटटयावर सरकारी भुमी आवंटीत केलेली आहे व उपलब्ध शिल्लक भुमीची तपशिल देण्यात यावी.

2. एखादी भुमी उत्खनन क्षेत्रात येईल याची निर्धारणा करण्याची पध्दती सांगण्यात यावी

3. सरकारी भुमीला उत्खनन कार्याकरीता पटटेवर घेण्याची पध्दती व प्रक्रिया सांगण्यात यावी.

4. नगर रचना विभागात नोंद नसून देखिल पाचगाव व कुही व तत्सम इतर क्षेत्रात उत्खननचे कार्य कशी व कोणाच्या आदेशाप्रमाणे सुरु आहे. याची तपशील पटटेधारकांच्या नाव पत्ता दुरभाष क्र. व भ्रमणध्वनी क्र.

सदरची माहिती यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 7.7.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 16.7.2008 रोजी माहिती मिळाली परंतु प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.7.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 4 ची माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध असल्यास द्यावी उक्त नियम कुठून व कसे प्राप्त करुन घेता येईल किंवा त्या नियमपुस्तीकेतील मागणी माहिती किंवा त्यापैकी एक अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी किंवा त्याविषयी सविस्तर कळवावे. तसेच अपीलकर्ता यांनी माहिती व्यक्तीशः देण्याचे मान्य केले आहे. तरीसुध्दा विहित मुदतीत माहिती कार्यालयातून घेवून जाण्याकरीता पत्रव्यवहार न केल्याने अपीलार्थीस सदर माहिती आदेशाच्या 30 दिवसाचे आंत निःशुल्क उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. असे असले तरी अपीलकर्ता यांना दि. 30.8.2008 रोजी चारही मुद्याच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन देवून अपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपुर्ण असून व शासन निर्णयाची प्रत सुध्दा फक्त प्रथम पृष्ठ व शेवटचे पृष्ठ दिलेले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये व्यक्तिशः माहिती घेवून जाणार असे नमूद केलेले आहे. पण अपीलकर्ता हे 30 दिवसाचे आंत माहिती घेण्यास आलेले नाही. व त्यामुळेच त्यांना माहिती ही विलंबाने कळविण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते कार्यालयात माहिती घेण्याकरीता 20 ते 25 वेळा गेलेले होते. परंतु कार्यालयात जाणे वेगळे व प्रत्यक्ष माहितीकरीता माहिती अधिका–यांना भेटणे वेगळे. व माहिती उपलब्ध करुन न दिल्यास आक्षेप घेणारे पत्र देणारे आवश्यक असते. तसेच व्यक्तिशः माहिती घेण्याच्या संदर्भामध्ये मुदतीत माहिती दिली नाही हा आक्षेप घेता येणे शक्य होते. म्हणून कार्यालयातील कोणत्याही व्यक्तीस भेटून माहिती अधिका–यांस जबाबदार धरता येत नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असेही आयोगाचे निदर्शनास आणले की अपीलकर्ता यांचा अर्ज हा अतिशय मोघम माहिती व कोणत्याही प्रकारचा माहितीचा कालावधी दिलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना कोणत्या कालावधीतील माहिती उपलब्ध करुन द्यावी हा प्रश्न उपस्थित होतो व ही बाब अपीलकर्ता यांना दि. 30.8.2008 च्या पत्रामध्ये कळविण्यात आलेली आहे. मात्र तरीही अपीलकर्ता यांनी माहितीचा कालावधी व निश्चित तपशिल हा कळविलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अर्जदाराने माहिती मागीतल्यावर ती माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे जी कार्यपध्दती मुद्यामध्ये दिलेली आहे त्या पेक्षा अपीलकर्ता यांना नियमाच्या छायांकीत प्रती

उपलब्ध करुन देणे योग्य असते. अन्यथा तयार करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचेकडे तपासणीस कोणतेही कागदपत्र नसल्यामुळे उपलब्ध करुन दिलेली माहिती चुकीची आहे असे म्हणण्याचा कल असतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या स्वतःच्या अर्जामध्ये त्रुटी असल्यामुळे सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील त्याकरीता अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहितीचा कालावधी तसेच स्पष्ट असा तपशिल हा जन माहिती अधिकारी यांना कळविणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 6.5. 2008 च्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहितीचा कालावधी निश्चित तपशिल असणारा अर्ज सादर करावा.

2) सदरचा अर्ज अपीलकर्ता यांनी सादर केल्यानंतर 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 28.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1219–1223

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 805/2008.**

श्री महेन्द्र सदाशिव पांडेय

चुडी मोहल्ला पुलगाव

ता. देवळी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा

2) श्री मुन

जन माहिती अधिकारी तथा

जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.9.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.6.2008 रोजी माझ्या दि. 11.6.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने पारीत झालेल्या प्रस्तावाची प्रत पुरविणेबाबत. शासनाने नगर परिषदेवर कार्यवाही करावी अशी शिफारशी करणे हे आपल्या अधिकाराची बाब असून तसा

अहवाल आपण शासनास सादर करावा व त्याची प्रत मला दयावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता यांच्या दि. 26.12.2007 च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे 1 एप्रिल 2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व तीच माहिती त्यांनी या अर्जात मागितलेली असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. यावरुन अपीलकर्ता त्यांच्या स्वतःच्या हिताकरीता तीच तीच माहिती मागत असून नगर परिषदेस वेठीस धरीत आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. याच कारणास्तव अपील क्र. 357/2008 यापूर्वीच खारीज करण्यात आलेले आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 28.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1224–1225

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 806/2008.**

श्री केवलदास उद्धवराव पिसटुरकर

रा. काजळसरा ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

जिल्हाधिकारी वर्धा

2) श्री एम. टी. खाडीलकर

जन माहिती अधिकारी तथा

उपविभागीय अधिकारी हिंगणघाट

ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.3.2008 रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात पोलीस पाटीलकीचा अर्ज कुठे करावा धरणग्रस्थ बि. ए. फायनल अशा प्रकारे माहितीचा तपशिल दिलेला दिसून येतो.

सदरचा अर्ज जिल्हाधिकारी यांचेकडून उपविभागीय अधिकारी हिंगणघाट यांचेकडे पुढील

कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला दिसतो. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दि. 30.7.2008 रोजी उपविभागीय अधिकारी हिंगणघाट यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती अपीलकर्ता यांना दि. 20.9.2008 रोजी प्राप्त झाली आहे असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना लेखी परीक्षेमध्ये 90 टक्के गुण मिळावयास पाहिजे होते परंतु त्यांची निवड झालेली नाही व माहितीसुध्दा व्यवस्थित पुरविलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज हा जिल्हाधिकारी यांचेकडे केला होता. सदरचा अर्ज हा उपविभागीय अधिकारी यांचेकडे हस्तांतर करण्यात आला. माहितीच्या अर्जामध्ये पोलीस पाटीलकीचा अर्ज कुठे करावा अशी त्यांनी माहिती मागीतली. प्रथम अपीलामध्ये पोलीस पाटील पदाकरीता धरणगस्थ म्हणून अर्ज केला होता. त्यात मला डावलण्यात आले. दस्तऐवजाच्या व शासन निर्णयाच्या प्रती द्याव्या. रजिस्टर पोष्टाने माहिती घेणार असे नमूद केलेले दिसते. यावरुन अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज व प्रथम अपील मेमो यामध्ये कोणत्याही प्रकारचा ताळमेळ दिसून येत नाही. व अपीलकर्ता यांना कोणती माहिती अपेक्षित होती याबद्यल निश्चितता दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता यांना लेखी परीक्षेच्या संदर्भातील माहिती पाहिजे असेच दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना लेखी परीक्षेच्या संदर्भात जे परीक्षेत गुण दिलेले असतील त्या गुणांची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या पोलीस पाटीलच्या लेखी परीक्षेमध्ये मिळालेले गुण व इतर उमेदवारांना मिळालेले गुण हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 28.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1226–1228

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 801/2008.**

श्री संजय मनोहरराव वारजुरकर
मु. पो. शंकरपूर चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात पोलीस विभागाकडून प्राप्त अभिप्राय लक्षात घेता आपला

आत्मसंक्षणार्थ शस्त्र परवाना नामंजुर करण्यात आला आहे. अशी माहिती अधिकारातील माहिती उत्तरात दिले असून मला दिलेली माहिती योग्य वाटत नसून मला माहिती अधिकारातील खालील दिलेल्या प्रश्नाची व कागदपत्राची पूर्तता करण्याबाबत. अपीलकर्ता यांनी तीन मुद्यांवर माहिती विचालेली दिसून येते.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.8.2008 रोजी तहसिलदार चिमूर यांचे मार्फत निवासी उपजिल्हाधिकारी तथा माहिती अधिकारी चंद्रपूर यांनी तीन्ही माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 4.10.2008 रोजी निर्णय दिलेला असून अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाने सुध्दा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की संपूर्ण प्रकरणाच्या निर्णयाच्या संदर्भात गुणवत्तेबाबत युक्तीवाद केला. व त्यांच्या विरुध्द जो निर्णय देण्यात आलेला आहे तो निर्णय कसा अन्यायकारक आहे याबाबतची माहिती आयोगास दिली. परंतू जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांच्या शस्त्र परवाना नाकारण्याच्या संदर्भामध्ये जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय हा पोलीसच्या अहवालावरुन झालेला असल्यामुळे पोलीसच्या अहवालाच्या संदर्भातच त्यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असेही असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये सुध्दा सर्व अभिप्रायात्मक प्रश्न विचारलेले आहेत. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दि. 14.8.2008 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अभिप्रायात्मक प्रश्न विचारता येत नाही व

त्यामुळे सदरची माहिती देय नाही असे कळविण्यात आलेले होते. मात्र त्या संदर्भातील कोणतेही कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नव्हती. वास्तविक अपीलकर्ता यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत ते प्रश्न हे पोलीस अहवाल उपलब्ध झाल्यावर त्यांनी उपस्थित केलेले दिसून येतात. पूर्वीही त्यांना माहितीच्या अधिकारात त्यांच्या अर्जाबद्यलची माहिती उपलब्ध करुन दिलेली होती व त्यामुळे सदरच्या अर्जात कागदपत्र मागितलेली नसल्यामुळे ती कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नव्हती. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या प्रकरणातील कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिल्यामुळे अपीलकर्ता यांना त्या प्रकरणातील कागदपत्राच्या छायांकीत प्रती हया उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की 30 दिवसाचें आंत कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरची कागदपत्रे ही विनामुल्य उपलब्ध करुन होणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांनी कागदपत्रे मागितलेली नाही असे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' व (त्र) प्रमाणे ''माहिती अधिकार'' या दोन संज्ञेची व्याख्या केलेली आहे. त्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या सवरुपात उदा. अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे टिपण्या इत्यादी स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. व त्यामुळे एखाद्या प्रकरणातील निर्णयाच्या समर्थनार्थ किंवा त्या निर्णयाच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कारणमिमांसा ही जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. 14.8.2008 चे दिलेले उत्तर हे योग्य आहे.

4. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला असल्यामुळे व सदरची कागदपत्रे ही अतिरिक्त खर्चाचा भरणा करुन दिलेला असल्यामुळे ती 30 दिवसाचे आत दिलेली नाही त्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन

देणे संयुक्तिक झाले असते असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरचे अतिरिक्त खर्चाचा केलेल्या भरणाची रक्कम ही परत करणे संयुक्तिक राहिल. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांना जर तक्रार करावयाची असेल तर ती तक्रार ही स्वतंत्रपणे त्यांच्या वरीष्ठ अधिका–याकडे करुन न्याय मिळवून घेणे आवश्यक असते. शस्त्र परवाना जिल्हाध्किारी यांनी नाकारलेला असल्यास त्याविरुध्द शासनाकडे अपीलाची तरतुद आहे व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे निर्णयाच्या गुणवत्तेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा आदेश देता येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना कागदपत्रे विनामुल्य उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्याकडून अतिरिक्त खर्चाकरीता रु. 116/– जो भरणा करुन घेतलेला आहे ते रु. 116/– हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना परत करण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 28.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांचेकडून मुळ प्रत मंजुर

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.1229–1232

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 802/2008.**

श्री संजय मनोहरराव वारजुरकर
मु. पो. शंकरपूर चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. डी. रुडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर पोलीस अधिक्षक
चंद्रपूर
2) श्री टी. के. रॉय
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधिक्षक ( मुख्यालय )
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.5.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.10.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक कार्यालय यांचेकडे दि. 6.12.2003 ते 14.6.2008 या कालावधीतील एकुण 8 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती रजिष्टर टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.8.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता अतिरिक्त खर्च रु. 73/— हा कळविण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतर अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेतलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.9.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 5.11.2008 रोजी अप्पर पोलीस अधिक्षक यांनी संदर्भिय अपीलाच्या अनुषंगाने दि. 8.10.2008 रोजी आपण सुनावणीसाठी स्वतः हजर झाले. सुनावणी दरम्यान आपण अपील अर्जात नमुद केलेल्या माहिती पैकी मुद्या क्र. 5 मध्ये माहिती व्यतिरिक्त इतर सर्व मुद्यावरील माहिती बाबत आपण समाधानी असल्याचे मान्य केले. तसेच मुद्या क्र. 5 मध्ये मागितलेली माहिती देण्यासाठी संबंधिताकडून माहिती मागविणे असल्यामुळे मुद्या क्र. 5 ची माहिती एक महिन्याचे कालावधीमध्ये पुरविण्याची विनंती केली होती. त्यानंतर मुद्या क्र. 5 विषयी आम्ही खालीलप्रमाणे माहिती देत आहो. गोपनिय चौकशी केल्याबाबतचे कोणताही अभिलेख आमचे विभागाचे कार्यालयाला उपलब्ध नाही. पोस्टे भिसी येथे आपले विरुध्द पुढीलप्रमाणे दोन गुन्हे नोंद आहेत. 1. अपराध क्र. 71/98 कलम 325, 294, 506 भादवि 2. अपराध क्र. 41/2005 कलम 147, 336, 506 भादवि याव्यतीरीक्त आपले विरुध्द कोणत्याही तक्रारी नाहीत. वरील माहिती आम्ही संबंधीत अधिका—यांकडुन केलेल्या माहितीच्या आधारे आपणास देत आहोत. संबंधीत अधिका—यांनी कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखावरुन दिल्याचे दिसून येते. तत्पूर्वीच अपीलकर्ता यांनी दि. 13.10.2008 रोजी म्हणजे सुनावणी झाल्याच्या दि. 8.10.2008 नंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना त्यांच्या विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाच्या संदर्भामध्ये प्रश्नचीन्ह आयोगापुढे उपस्थित केले. तसेच तत्कालीन जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी कोणत्या आधारे मत व्यक्त केलेले आहे याबाबतची कागदपत्रे त्यांना दिलेली नाहीत असाही युक्तवाद त्यांनी केला. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली त्याकरीता अतिरिक्त खर्च जो कळविण्यात आलेला आहे तो विलंबाने कळविण्यात आलेला असल्यामुळे त्यांना कागदपत्रे विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांनी तत्कालीन जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी दिलेल्या अभिप्रायाच्या संदर्भामध्ये आयोगाचे पुढे जो युक्तीवाद केला त्या युक्तीवादाचा विचार केल्यास दि. 5.11.2008 चे उत्तर हे स्वयंस्पष्ट आहे. अपीलकर्ता यांना शस्त्र परवाना मागण्याकरीता जो अर्ज कोला तो दि. 6.12.2003 रोजी केलेला आहे व अपीलकर्ता यांचे विरुध्द पोस्टे भिसी येथे जो गुन्हा दाखल झालेला आहे तो सन 1998 मध्ये झालेला आहे. तसेच सन 2005 मध्ये झालेला आहे. त्यामुळे सदरच्या शस्त्र परवान्या संदर्भात ज्या वेळेस अपीलकर्ता यांनी पोलीस अहवाल मागविला आहे त्यावेळेस अर्थातच अपीलकर्ता यांचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाच्या संदर्भातच त्यांनी अभिप्राय जिल्हाधिकारी यांना दिलेला दिसून येतो व ही कार्यपध्दती आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना सुध्दा सर्व प्रकरणाची माहिती असून सुध्दा त्यांनी असे मत का व्यक्त केले असा ते प्रश्न उपस्थित करीत आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की तत्कालीन पोलीस अधिक्षक यांनी त्यांचे जे अभिप्राय दिलेले आहे ते अभिप्राय कशाचे आधारे दिले आहे याबाबतचे कागदपत्र त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही व तसे अपीलकर्ता यांना सुध्दा कळविलेले आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांचे विरुध्द कागदपत्रे असल्याशिवाय असा अभिप्राय व्यक्त करता येणार नाही व त्याकरीता त्यांना सदरचे कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अशी व्यवस्था असल्यामुळे तत्कालीन पोलीस अधिक्षक श्रीयुत रविंद्र

कदम सध्या पुणे जिल्हा (ग्रामीण) येथे कार्यकरत आहेत त्यांचेकडून त्याबाबतचा खुलासा प्राप्त करुन घेणे आवश्यक राहिल व त्यानंतरच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या करीता जो अतिरिक्त खर्चाचा भरणा करण्यात आलेला आहे त्यापैकी रु. 48/– हे त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत परत करण्यात यावे. अपीलकर्ता यांचे विरुध्द जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी जे अभिप्राय व्यक्त केलेले आहे त्या संदर्भामध्ये तत्कालीन जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीयुत रविंद्र कदम यांचेकडून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत खुलासा मागवून दि. 17.8.2009 रोजी आयोगापुढे सादर करावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 28.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**